बुधवार, १७ ऑगस्ट २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ३१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

शिवसेना जि.प. सदस्य विजय भोईरांचा राजीनामा/२
रेवस बंदरातील स्वच्छतागृहात पाण्याची गैरसोय/५
टेबल टेनिस स्पर्धेत अनिशा, लोकेश विजेते/८

## दहीहंडी पथकातील गोविंदांना १० लाखांचे विमा कवच



**मुंबई** : राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी (दि. १६) झालेल्या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध घोषणा केल्या. त्यानुसार दहीहंडी पथकातील गोविंदांना १० लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळणार आहे. शासनाने विमा कवच द्यावे, अशी गोविंदा पथकांची मागणी होती. या मागणीनुसार शासनाकडून गोविंदांना १० लाखांचे विमा संरक्षण देण्यात येणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन सेवेच्या एसटी बसेसमधून मोफत प्रवास करता येणार आहे. त्याचप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर महागाई भत्त्यात तीन टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यामुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३१वरून ३४ टक्के होणार आहे.

### आजपासून राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

# नवे सरकार सज्ज



**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला बुधवार (दि. १७)पासून प्रारंभ होत आहे. या पार्श्वभूमीवर नवे सरकार सज्ज झाले असून अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सह्याद्री अतिथीगृहात आयोजित चहापान कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.**

शिवसेना नेते एकनाथ शिंदे व सहकारी आमदारांनी तत्कालीन मुख्यमंत्री तथा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविरोधात उठाव केल्याने महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर मुख्यमंत्रीपदी शिंदे व उपमुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली. महिनाभराने मंत्रिमंडळ विस्तार होऊन लगोलग खातेवाटपही झाले. या सरकारमध्ये अनेक अनुभवी मंत्र्यांचा समावेश आहे.

यंदाचे पावसाळी अधिवेशन १७ ऑगस्टपासून मुंबई येथील विधान भवनात सुरू होणार असून २५ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. या कालावधीत १९, २०, २१ ऑगस्ट या सार्वजनिक सुट्या आहेत, तर २४ ऑगस्ट रोजी विधिमंडळ कामकाजात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# आमचे सरकार सर्वसामान्यांचे -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

आमचे सरकार सर्वसामान्यांचे सरकार आहे ही भावना जनतेच्या मनात तयार झाली आहे. विरोधकांना त्याचा त्रास होणे स्वाभाविक आहे, कारण ते आधी सरकारमध्ये होते, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधी पक्षांतील नेत्यांवर मंगळवारी (दि. १६) पलटवार केला. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापानानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, लोकशाहीत तत्त्व असतात, भूमिका असते, विचार असतो. आम्ही बाळासाहेबांच्या भूमिकेतून त्यांच्या विचाराचे सरकार स्थापन केले आहे. आमची भूमिका जनतेला पटली नसती तर आज राज्यभरात आमचे, आमच्या आमदारांचे, खासदारांचे जे स्वागत होत आहे ते झाले असते का?

महाराष्ट्रात एकाही तालुक्यात दुष्काळी स्थिती नाही. हा दुर्मिळ योगच म्हणावा लागेल. म्हणजे निसर्गानेही आमच्या सरकारला साथ दिलीय. विरोधी पक्षनेत्यांनी काही मुद्दे आपल्या पत्रकार परिषदेत मांडले. आम्हाला सात पानी पत्र दिले आहे. मला वाटले हा अंतिम आठवडा प्रस्ताव आहे की काय, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही ही आमची पहिल्यापासूनची भूमिका आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे हे कर्तव्य आहे आणि ते आम्ही चोख बजावू, असेही ते म्हणाले.

### विरोधकांमध्ये एकी नाही -उपमुख्यमंत्री

महाविकास आघाडी सरकारमध्ये एकी नव्हती. जनतेच्या हिताचे निर्णय लांबच राहिले आहेत. विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेत्याची निवड आम्हाला न विचारता केली असे काँग्रेस नेते बोलले आहेत, तर दुसरीकडे राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षांनीही याबाबत नाराजी व्यक्त केली होती. सत्तेत असतानाही तीन पक्षांमध्ये एकी नव्हती. आता विरोधी पक्षात गरज असतानाही एकी दिसत नाही. विरोधकांनी आमची चिंता करण्यापेक्षा त्यांनी त्यांच्यामधील एकीची चिंता केली पाहिजे, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी लगावला. आधी मंत्रालय, सह्याद्री, मंत्र्यांचे बंगले रिकामे होते, आता इथे पाय ठेवायला जागा नाही. मुख्यमंत्री, मी, आमचे नेते मैदानात आहेत, असे म्हणत त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावरही टीका केली.

# ज्यांनी अडीच वर्षांत काही केले नाही ते शहाणपण शिकवताहेत

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा विरोधकांना टोला



**चिमूर : प्रतिनिधी**

ज्यांनी अडीच वर्षे काही केले नाही ते आम्हाला आता शहाणपण शिकवत आहेत, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीला खोचक शब्दांत टोला लगावला आहे. चिमूरमध्ये मंगळवारी (दि. १६) आयोजित शहीद स्मृतिदिन कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी त्यांनी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचा समाचार घेतला.

या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहिदांना श्रद्धांजली वाहिली. या वेळी विरोधकांवर टीका करताना ते म्हणाले की, गेल्या अडीच वर्षांत राज्यात सरकार नावाची गोष्टच अस्तित्वात नव्हती. अडीच वर्ष ज्यांनी काहीही केले नाही ते आज आम्हाला शहाणपण शिकवत आहेत. माझे त्यांना एवढेच सांगणे आहे की, पाच वर्षे आमचे सरकार होते. सरकार कसे चालते हे आम्ही दाखवून दिले. आजही लोक लक्षात ठेवतात की २०१४ ते २०१९मध्ये जनतेचे सरकार होते. आता पुन्हा एकदा आम्ही सत्तेत आलो आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा लोकाभिमुख कारभार आम्ही करू.

गेल्या अडीच वर्षांत ७०० रुपये बोनस देतो, असे सांगून धानाचा एक नवा पैसा शेतकऱ्याला मिळाला नाही. आपण त्याच वेळी सांगितले होते की, लबाडाचे आवतण जेवल्याशिवाय खरे नाही. हे लबाडच निघाले, पण आजच मुख्यमंत्र्यांसोबत मी बोनस देण्यासंदर्भात चर्चा करेन. आपले सरकार याबाबत सकारात्मक निर्णय घेईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

संजय गांधी निराधार योजनेचे पैसे गरीब विधवांना सहा-सहा महिने मिळाले नाहीत. प्रत्येक सामान्य माणसाला त्रास देण्याचे काम झाले, पण आता चिंता करण्याचे कारण नाही. लवकरच सगळ्या गोष्टी आपण मार्गी लावू, असेही उपमुख्यमंत्री फडणवीसांनी नमूद केले.

## निवडक

### जम्मू काश्मीरमध्ये बस अपघात; सहा जवान शहीद

**श्रीनगर** : जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये आयटीबीपी अर्थात इंडो-तिबेट बॉर्डर पोलीस दलाच्या जवानांची बस दरीत कोसळली. या अपघातात सहा जवान शहीद, तर २३ जण जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातग्रस्त बस चंदनवारी भागातून पहलगामच्या दिशेने येत होती. बसचे ब्रेक निकामी झाल्यामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

### वाघाच्या हल्ल्यात शेतकरी मृत्युमुखी; गुराखी जखमी

**चंद्रपूर** : ब्रम्हपुरी तालुक्यातील दुधवाही येथील शेतशिवरात वाघाने केलेल्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी (दि. १६) सकाळी समोर आली. मुखरू राऊत (६२) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे, तर याच तालुक्यात पद्मापूर येथे वाघाच्या हल्ल्यात पद्माकर मडावी हा गुराखी जखमी झाला. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.



# पावसाचा जोर वाढला

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडसह राज्यात जिल्ह्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला आहे. मंगळवारी (दि. १६) दिवसभर पावसाच्या सरी कोसळत होत्या. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, पुढील तीन दिवस असाच पाऊस पडण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविला आहे.

अनेक भागांत सोमवारी संध्याकाळीच पावसाला सुरुवात झाली. रात्रीही पावसाची संततधार कायम होती. त्यानंतर मंगळवारी सकाळपासून बहुतांश भागात जोरदार पाऊस पडू लागला. या दरम्यान वारेही वाहत होते. त्याचा जनजीवनावर परिणाम झाला.

### खालापुरात समाजमंदिराची भिंत कोसळून नुकसान

**खोपोली** : जोरदार वारा-पावसात खालापूर तालुक्यातील परखंडे आदिवासी वाडीतील समाजमंदिराची भिंत कोसळली. त्यामुळे तेथे ठेवण्यात आलेल्या आदिवासी बांधवांच्या सार्वजनिक वस्तूंचे नुकसान झाले आहे. मंडल अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

**(अधिक वृत्त पान ५ वर..)**

# अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेलमध्ये विविध उपक्रम उत्साहात

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा





**पनवेल : वार्ताहर**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून तसेच श्रावणी सोमवार व संकष्ट चतुर्थीनिमित्त केदार भगत मित्र परिवारकडून पनवेल येथील विरूपाक्ष मंदिरात आलेल्या सर्व भाविकांना उपवासाच्या खिचडीचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे आधार कार्डला मोबाइल लिंक आणि पोस्टाचे सुकन्या समृद्धी खाते मोफत काढून देण्यात आले. अनेकांनी याचा लाभ घेतला.


या कार्यकमाला कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप प्रदेश सदस्य श्रीनंद पटवर्धन, माजी नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, अजय बहिरा, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजपचे अमरिश मोकल, शिंदे गटाचे गणेश वाघिलकर, अभि दुर्गे, फाल्गुनी दुर्गे, चंद्रकांत मंजुळे, नीता मंजुळे, भरत जाधव, बाळा जाधव, प्रसाद म्हात्रे, रूपाली शिंदे, संजू पाटील, गौरव बांठिया यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# देशी-विदेशी पक्ष्यांची रायगडात सफर

### विविध प्रजातींचे दर्शन; अभ्यासक, निरीक्षकांना पर्वणी







**सुधागड : रामप्रहर वृत्त**

दमदार पावसाने निसर्ग खुलला असून पक्ष्यांसाठी आल्हाददायक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यात सध्या देशी-परदेशी पक्ष्यांचे दर्शन होत आहे. पक्षी अभ्यासक व निरीक्षकांना ही पर्वणी मानली जात आहे.

पावसाळ्यात विविध पक्ष्यांचे दर्शन घडते. अनेक पक्षांचा हा विणीचा हंगामसुद्धा आहे. जिल्ह्यात परदेशी तिबोटी खंड्याचे आगमन झालेले आहे. त्याबरोबरच जांभळी लिटकुरी, नीलिमा/नीलमणी, सोनपाठी सुतार, पाणथळ जागेत राहणारे टिबुकली, आशियाई मुग्धबलाक, रात-बगळा, मराल आदी पक्ष्यांचेही दर्शन होत आहे.

जिल्ह्यात पनवेलजवळ कर्नाळा हे पक्षी अभयारण्य आहे, तर मुरूड येथे फणसाड अभयारण्य आहे. शिवाय जैवविधेतेने समृद्ध असे १३६ अधिकृत पाणथळ प्रदेश आहेत. तेथेही विपूल प्रमाणात पक्षी आढळतात.

> ***समृद्ध जैवविविधता, मुबलक खाद्य, अनुकूल हवामानामुळे रायगड जिल्ह्यात निरनिराळ्या प्रकारचे पक्षी आढळतात. पावसाळ्यात तर पक्षी निरीक्षणाची पर्वणी असते. विविध ठिकाणचे पक्षी अभ्यासक येथे पक्षी निरीक्षणासाठी येतात.***
> **-राम मुंडे, पक्षी अभ्यासक व निरीक्षक**

### माणगावजवळ ओढ्यात आढळली बेवारस कार

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव तालुक्यातील चांदोरे गावाच्या हद्दीत ओढ्यामध्ये बेवारस स्थितीत पडलेली एक कार पोलीस व रेस्क्यू टीमने मंगळवारी (दि. १६) क्रेनच्या सहाय्याने बाहेर काढली. बेवारस स्थितीत ओढ्यात सापडलेल्या या कारबद्दल नागरिकांत चर्चा रंगल्या आहेत.

चांदोरे गावच्या हद्दीतील ओढ्यात एक कार (एमएच १४-डीएफ ४१६७) पडली असल्याची माहिती ग्रामस्थ सुजित शिंदे यांनी मंगळवारी सकाळी दूरध्वनीवरून माणगाव पोलिसांना दिली. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील, निरीक्षक राजेंद्र पाटील व पथकाने घटनास्थळी तातडीने जाऊन पाहणी केली. त्या वेळी त्यांना पांढऱ्या रंगाची गाडी ओढ्यात अर्धवट बुडालेल्या अवस्थेत दिसली. ही कार रेस्क्यू टीमच्या विशेष मदतीने व क्रेनच्या सहाय्याने पाण्याबाहेर काढण्यात आली. पोलीस या गाडीची अधिक चौकशी करीत आहेत.

# स्वराज्य महोत्सव अंतर्गत आज समूह राष्ट्रगीत गायन

### पनवेल मनपाही होणार उपक्रमात सहभागी

**पनवेल : प्रतिनिधी**

स्वराज्य महोत्सव अंतर्गत बुधवारी (दि. १७) सकाळी ११ वाजता राज्यात एकाच वेळी समूह राष्ट्रगीत गायन होणार आहे. पनवेल महापालिका हद्दीतही हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले गेले. शासनाकडून आयोजिल्या गेलेल्या स्वराज्य महोत्सवात शेवटच्या दिवशी अर्थात बुधवारी सकाळी ११ वाजता सर्वत्र समूह राष्ट्रगीत गायन केले जाणार आहे. यातही पनवेल महापालिका सहभागी होत आहे.



पनवेल महापालिका हद्दीत चारही प्रभागांतील मॉल्स, शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, मंदिरे अशा विविध ठिकाणी लाऊडस्पीकरच्या माध्यमातून समूह राष्ट्रगीत गायन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. याकरिता महापालिकेच्या वतीने अधिकारी, कर्मचारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी उत्स्फूर्तपणे या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

# लतादिदींच्या नावे संगीत महाविद्यालय

## ▌गानसम्राज्ञीच्या जयंती दिनी सुरू करण्याचे मुख्यमंत्री शिंदेंचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतरत्न दिवंगत लता मंगेशकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सुरू करण्यात येणारे आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय हे त्यांच्या जयंती दिनी २८ सप्टेंबर रोजी सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (दि. १६) मुंबईत दिले.



मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात बैठक झाली. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर, सुरेश वाडकर, समितीचे सदस्य संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, जागेअभावी संगीत महाविद्यालय सुरू करण्यास वेळ लागू नये, यासाठी तात्पुरत्या जागेची सुविधा उपलब्ध करून तातडीने या वर्षी किमान प्रमाणपत्र कोर्स सुरू करावा. त्यानंतर टप्याटप्याने पदविका आणि पदवी कोर्स सुरू करण्यात यावेत. हे आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय आहे. तेवढेच दर्जेदार महाविद्यालय असले पाहिजे आणि तातडीने सुरू करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी बैठकीत सांगितले.

मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पससमोर उच्च व तंत्र शिक्षण विभागाची जागा असून त्याच जागेत भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय उभारण्यात येणार आहे. त्यासाठी एका समितीची स्थापनाही करण्यात आली होती. या समितीने यावर्षी सुरू करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाचा अहवाल लवकर सादर करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

महाविद्यालय यावर्षी सुरू करण्यास जागेअभावी अडचण येऊ नये म्हणून पु. ल. देशपांडे कला अकादमीमध्ये तात्पुरते महाविद्यालय सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

दि. २८ सप्टेंबर रोजी भारतरत्न लता मंगेशकर यांची जयंती आहे, यानिमित्त यावर्षी पहिली बॅच सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## राजिप सदस्य विजय भोईर यांचा शिवसेनेला ‘जय महाराष्ट्र’

**उरण : प्रतिनिधी**

शिवसेनेचे नवघर गटातील राजिप सदस्य विजय भोईर यांनी शिवसेनेच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. या मुळे उरण तालुक्यात कायम अभंग राहिलेल्या शिवसेनेला पहिला धक्का बसला.



राज्यात शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांचा एक गट आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा एक गट अशी विभागणी झाली आहे. राज्यात लोकांची कामे होत नव्हती म्हणून एकनाथ शिंदे आणि त्यांचे समर्थक यांनी शिवसेनेची साथ सोडली. दरम्यान, पुढील काळात हे दोन्ही गटात समझोता घडून एकत्रित येतील अशी आशा काहिंना होती. मात्र आता ती वेळ निघून जात आहे. त्यामुळे सध्याच्या राजकीय स्थितीमुळे शिवसेना कार्यकर्ते व्दिधा मनस्थितीत सापडले आहेत. लोकांची कामे केली नाहीत तर त्यांना आपले राजकीय भवितव्यही अंधारमय दिसू लागले आहे. या मुळे बरेच कार्यकर्ते आता शिंदे गटाकडे जात आहेत. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजिनामा देत असल्याची भावना विजय भोईर यांनी राजीनामा पत्रात व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, भोईर यांच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र केल्याच्या पवित्र्यामुळे अभंग राहिलेल्या सेनेला उरणमध्ये पहिला धक्का बसला आहे.

## कर्जतमधील लोकन्यायालयात एकूण ५३१ दावे निकाली

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुका विधी विभागाच्या वतीने लोकन्यायालय आयोजित करण्यात आली होती. दिवाणी न्यायालयाचे प्रथम वर्गचे दोन न्यायाधीश यांनी कामकाज पहिले. या लोकन्यायालयात तब्बल ५३१ प्रलंबित दावे निकाली काढण्यात आले. कर्जत बार असोसिएशनने या लोकन्यायालयाच्या आयोजनात सहभाग घेतला होता.

विधी विभागाचे वतीने कर्जत येथील दिवाणी न्यायालयात लोकन्यायालय आयोजित केले होते. स्वातंत्र्य दिनाचे दिवशी आयोजित केलेल्या या लोकन्यायालयात न्यायाधीश म्हणून प्रथमवर्ग न्यायाधीश एस आर शिंदे आणि आपटे यांनी कामकाज पाहिले. तर कर्जत बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. योगेश देशमुख, तसेच ज्येष्ठ वकील राजेंद्र निगुडकर, डिमेलो, पूजा कोंडेकर, नरेश अहिर, रुपेश पाटील, भारत सावंत, केशव मोरे, गजानन डुकरे, श्रीकृष्ण डुकरे, शिवाजी टोकरे, अजय भोईर,आदींचा सहभाग होता. या लोकन्यायालयासाठी दिवाणी न्यायालयातील प्रलंबित असलेले ४८ प्रकाराने निकाली काढण्यात आली. त्याचवेळी ग्रामपंचायत, महावितरण यांच्यातील वाद याबाबत चे प्रलंबित दावे लोकन्यायालयात ठेवण्यात आले होते, त्यातील ४८३ दावे निकाली काढण्यात आले. या लोकन्यायालयाच्या निमित्ताने स्थानिक गरजू आणि दावे यांच्यामुळे प्रलंबित असलेले दावे निकाली निघाल्याने त्यांचा लाभ होणार असून त्यांचा वाया जाणारा वेळदेखील वाचला आहे.

## गोडाऊनमध्ये चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोडावूनमधून जवळपास एक लाख २६ हजाराची रोख रक्कम चोरी केल्याची घटना पनवेलजवळील दत्त मंदिराच्या पाठीमागे जुना मुंबई-पुणे हायवे, पळस्पे फाटा येथे घडली आहे.

राजेश शहा यांच्या जे. के. ॲण्ड सन्स, परमेश्वरी कॉर्पोरेशन कंपाउंड पळस्पे फाटा या ठिकाणी असलेल्या गोडावूनमध्ये अज्ञात चोरट्याने छताचे पत्रे खोलून त्याद्वारे आत प्रवेश केला. सीसीटीव्ही कॅमेरे कशाच्या तरी सहाय्याने वर करून ऑफिसमधील लोखंडी कपाटातील तसेच टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये असलेली रोख रक्कम असा मिळून जवळपास एक लाख २६ हजाराची रोख रक्कम चोरी केल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार दाखल आहे.

## श्रीवर्धन भाजपकडून स्वातंत्र्य दिनी क्रांतिस्तंभाला अभिवादन

### ▌पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांनाही मानवंदना

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या म्हणजेच अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून श्रीवर्धन भारतीय जनता पक्षाकडून सोमजाई मंदिराच्या पटांगणात असलेल्या क्रांतिस्तंभाला तसेच पेशवे मंदिरातील पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांच्या पुतळ्याला मानवंदना देण्यात आली.



देशाला स्वातंत्र्य मिळाले त्या वेळेला श्रीवर्धन म्हसळा व मुरुड या तालुक्यांचे मिळून जंजिरा संस्थान अस्तित्वात होते. देश स्वातंत्र्य झाला तरीही जंजिरा संस्थान भारत देशात विलीन झालेले नव्हते. जंजिरा संस्थान देशात विलीन व्हावे, यासाठी त्या वेळेला मोठ्या प्रमाणात उठाव करण्यात आला. सदर झालेल्या क्रांतिकारी उठावानंतर श्रीवर्धन म्हसळा व मुरुड हे तीन तालुके भारत देशात विलीन झाले. स्वातंत्र्यसंग्रामात हौतात्म्य पत्करलेल्या व कारावास भोगलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मरणार्थ या क्रांतीस्तंभाची उभारणी करण्यात आली होती. या क्रांती स्तंभावर महादेव सदाशिव पेडसे व विष्णू चिंतामण जोशी अशी नावे लिहिलेली आढळून येतात.

श्रीवर्धनसारख्या छोट्या गावात जन्म घेऊन आपल्या कर्तृत्वाने मराठेशाहीची पेशवाईची सूत्रे स्वीकारणाऱ्या पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला यावेळी पुष्पहार घालून मानवंदना देण्यात आली. तसेच सोमजाई मंदिराचे पटांगणात असलेल्या क्रांतिस्तंभालादेखील मानवंदना देण्यात आली. या वेळी श्रीवर्धन तालुका भाजप अध्यक्ष प्रशांत शिंदे, रायगड जिल्हा चिटणीस मनोज गोगटे, भाजप महिला शहर अध्यक्षा रूपा सुखदरे, हिंदू महासभा अध्यक्ष देवेंद्र भुसाणे, शहर कमिटी अध्यक्ष आदेश पाटील, शहर चिटणीस लक्ष्मण पावशे यासह भाजपचे सर्वपदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुंबईच्या प्रभादेवीत भाजपकडून दहीहंडी सराव शिबिर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील सण उत्सव आणि परंपरा जपण्यासाठी भाजपच्या वतीने दादर प्रभादेवी परिसरात सातत्याने प्रयत्न केले जातात. दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने गोविंदा पथकांना सराव करता यावा यासाठी सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गोविंदा पथकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी भाजपकडून प्रयत्न केले जातात.



दरम्यान, सराव शिबिराला शेकडो कार्यकर्ते आणि हजारो गोविंदा सहभागी झाले होते.

भाजपा मुंबईचे सचिव सचिन शिंदे यांनी या सराव शिबिराचे आयोजन केले होते. दरम्यान, मुंबईतील गोविंदा पथकांच्या सुरक्षेसाठी भाजपाच्या वतीने विमा सुरक्षा कवच प्रदान करण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक गोविंदा पथकाचा सुमारे दहा लाख रुपयांचा विमा उतरवला जात आहे. गोविंदा पथकांनी याचा लाभ घेण्यासाठी त्वरीत आपली नावे नोंदवावीत असे आवाहन सचिन शिंदे यांनी केले आहे. या वेळी बोलताना भाजप आमदार प्रसाद लाड म्हणाले, भाजपच्या वतीने आयोजित केलेल्या या दहीहंडी सराव शिबिराला गोविंदा पथकांनी आणि कार्यकर्त्यांनी अभूतपूर्व प्रतिसाद नोंदविला. प्रतिसादामुळे सर्व प्रभादेवी ही उत्सवमय आणि भाजपामय दिसून येत आहे.

## मोटरसायकलची चोरी

**पनवेल** : राहत्या घरासमोर उभी करून ठेवलेली १० हजार रुपये किमतीची हिरो कंपनीची सीबीझेड एक्स्ट्रीम मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना तालुक्यातील साई ते केळवणे जाणाऱ्या रस्त्यावर घडली. महेंद्र पाटील (३४) यांनी त्यांची मोटरसायकल (एमएच-४६-एए-१८१४) राहत्या घरासमोर उभी ठेवली होती. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेल्याची याबाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## घरातील कपाटातून दागिन्यांची चोरी

**पनवेल :** अज्ञात चोरट्याने घरातील बेडरुममधील लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना तालुक्यातील चिंध्रण येथे घडली आहे. पांडुरंग कडू (रा. चिंध्रण) यांच्या घराच्या मागील दरवाजाचा कडीकोयंडा कोणत्या तरी हत्याराने तोडून त्याद्वारे घरात प्रवेश करून चोरट्याने दागिने चोरले.



**मुंबई : माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांना स्मृती दिनानिमित्त भारतीय जनता पक्ष प्रदेश कार्यालयात मंगळवारी आदरांजली वाहण्यात आली. या वेळी प्रदेश सरचिटणीस व सहकार मंत्री अतुल सावे, ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी आदी उपस्थित होते.**



## हिंदू लोहार समाजातर्फे खेळाचे साहित्य वाटप

**पनवेल : वार्ताहर**

हिंदू लोहार समाज पनवेल तालुका सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्यामार्फत शनिवारी (दि. ६) रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धामणी येथे आदिवासी भागातील शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खेळाचे महत्त्व जाणून घेऊन शाळेच्या मागणीनुसार विविध प्रकारचे खेळाचे साहित्य वाटप करण्यात आले.

या साहित्यात क्रिकेट सेट, लगोरी, कॅरम सेट, दोरी उड्या, सापसिडी, व्यापारसेट, फुटबॉल, हॉलीबॉल, टेबल टेनिस, लेझीम, बॅडमिंटन व उजळणीची पुस्तके शाळेच्या ताब्यात देण्यात आली.

या वेळी मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र पायरे, उपाध्यक्ष संतोष जाधव, सचिव वसंत मोरे, जगन्नाथ पायरे, मंगेश मोरे, अजित मोरे, शैलेश जगताप, अविनाश मोरे, वसंत भागवत, गणेश खंडागळे, चंद्रकांत भागिवंत, प्रवीण मोरे, नथुराम जगताप, संदीप मुंढे व कोळंबेकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक राजेंद्र पायरे, रमेश वावळे व गणेश कुताल सरांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. संतोष जाधव व वसंत मोरे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन रमेश वावले यांनी तर उपस्थितांचे आभार गणेश कुतांल यांनी मानले व विशेष सहकार्य अविनाश मोरे यांनी केले.

## जेएनपीएममध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

जेएनपीएमध्ये भारताचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जेएनपीए प्रशासन भवन येथे झालेल्या मुख्य सोहळ्यात जेएनपीए बंदरातील कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



भा.रा.से. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे अधिकारी

या वेळी जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी, भा. प्र. से. यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, आणि जेएनपी बंदराचे सर्व विभागाध्यक्ष उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष संजय सेठी यांनी जेएनपीएचे सर्व कर्मचारी, कामगार विश्वस्त आणि भागधारकांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानांनी देशभक्ती या विषयावर शानदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## सत्याग्रह महाविद्यालयात ‘भारत घडवा’ प्रतिज्ञा

**नवी मुंबई : बातमीदार**

अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त सत्याग्रह महाविद्यालयाने खारघरमध्ये तिरंगा रॅली काढत भारत घडविण्याची प्रतिज्ञा केली. महाविद्यालयाने यानिमित्त विविध उपक्रम राबविले.



सत्याग्रह कॉलेजमधील विद्यार्थ्यांने हर घर तिरंगा अभियान राबविण्यासाठी आदिवासी पाडा, हैदरवाडी, बेलपाडा, फरशीपाडा, पापडीचा पाडा, ओवेगाव, ओवाकॅम्प, ओवापेठ, शिर्के कामगार वसाहत या भागातील एक हजारापेक्षा अधिक पालकांना झेंड्याचे वितरण न्यू इंडिया इन्सुरन्स कंपनीचे मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक गणेश करवडे यांच्या हस्ते करण्यात आले.

तळोजे पाचनंद येथील विद्यार्थी संस्थेच्या नियोजित सत्याग्रहभूमी शैक्षणिक संकूल खारघर येथे विद्यार्थी आणि पालक एकत्र जमले होते. सत्याग्रह कॉलेजचे संस्थापक डॉ. जी के. डोंगरगावकर यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. या वेळी डॉ. डोंगरगावकर यांनी उपस्थितांना संबोधित केले. सामाजिक कार्यकर्ते, संस्थाचे पदाधिकारी, पालक, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## रेल्वेत विसरलेली बॅग प्रवाशाला परत

**पुणे :** मुंबई-विशाखापट्टणम एक्स्प्रेसमधील प्रवासादरम्यान गाडीत विसरलेली पुण्यातील प्रवाशाची बॅग रेल्वेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या योग्य समन्वयातून प्रवासाला परत मिळाली. बॅग परत मिळाल्यामुळे प्रवाशाने रेल्वे प्रवाशांचे आभार मानले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आम्ही जमिन मालक **श्री. कृष्णा सोमा भोईर व दत्तात्रेय सोमा भोईर व इतर,** रा. खारपाडा, पो. जिते, ता. पेण, जि. रायगड खालील जमिन मिळकत खरेदीदार – सुजा राजकुमार नाडर, रा. साकीनाका, मुंबई यांना कायम स्वरूपी विक्री करण्याचे निश्चित केले आहे.

**जमिन मिळकतीचा तपशिल**
**मौजे – कर्नाळा, ता. पनवेल, जि. रायगड येथील**

| सर्वे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५९ | १/अ | ०–१५–४० पो.ख. ०–०२–३० | २.८७ |
| | | एकूण ०–१७–७० | |

सदर वरील मिळकतीची विक्री करीत असून तरी सदर जमिनीबाबत इतर दुसरा कोणाचा कोणत्याही प्रकारचा साठेकरार, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, भाडेपट्टा, चार्ज, लिअन वगैरे इतर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शन कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर जमिन ही निर्विवाद व निर्वेध आहे असे गृहित धरून आम्ही खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू यास मागावून येणारी हरकत, तक्रार वगैरे माझ्यावर बंधनकारक राहणार नाही.

**ठिकाण – पनवेल**
**दि. १७/०८/२०२२**


**सही/-**
**१) श्री. कृष्णा सोमा भोईर**
**२) श्री. दत्तात्रेय सोमा भोईर**
**जमिन मालक**
**मो.नं. ९८६०२५०५३७**

# कामगार भरतीत स्थानिकांना प्राधान्य द्या

## न्हावा-शेवा कंटेनर टर्मिनलप्रश्नी रवींद्र पाटील यांनी वेधले लक्ष

**उरण : वार्ताहर**

जेएनपीएने खासगीकरण करून ३० वर्षांसाठी चालविण्यासाठी दिलेल्या न्हावा-शेवा कंटेनर टर्मिनलमध्ये प्रशासनाकडून स्थानिक प्रकल्पग्रस्तांना डावलून परस्पर परप्रांतीय कामगारांची सुरू असलेल्या कामगार भरतीमुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोषाचा भडका उडाला आहे. कंपनीने चालवलेली थेट कामगार भरतीची प्रक्रिया तत्काळ बंद न केल्यास जेएनपीए प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जेएनपीटी वर्कर्स युनियनचे सरचिटणीस तथा माजी कामगार ट्रस्टी रवींद्र पाटील यांनी जेएनपीए अध्यक्ष संजय सेठी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



जेएनपीएने आपल्या मालकीचे एकमेव उरलेले कंटेनर टर्मिनल खासगीकरणातून मे. जे. एम. बक्षी कंपनीला ३० वर्षांसाठी दिलें आहे. या कंपनीने कंटेनर टर्मिनलचा ताबा घेताच बंदराचे न्हावा-शेवा फ्री पोर्ट कंटेनर टर्मिनल असे नामकरण केले आहे. जेएनपीएने आपले उरलेले एकमेव कंटेनर टर्मिनल पीपीपी तत्वावर चालविण्यास दिले आहे. त्यामुळे जेएनपीएकडे स्वताच्या मालकीचे आता कुठलेही कंटेनर टर्मिनल उरलेले नाही. त्यामुळे ज्या प्रकल्पग्रस्तांनी जेएनपीए बंदरासाठी शेत-जमीन, समुद्र किनारा दिला आहे. अशा स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरीची संधी थेट जेएनपीएमध्ये मिळणे जवळपास बंदच झाले आहे.

यातच आता अशी बाब निदर्शनास आली आहे की, ज्या मे. जे. एम. बक्षी कंपनीला जेएनपीएने पीपीपी तत्वावर आपले उरलेले एकमेव कंटेनर टर्मिनल चालविण्यास दिले आहे, त्यांनी न्हावा-शेवा फ्री पोर्ट कंटेनर टर्मिनलमध्ये प्रकल्पग्रस्तांना डावलून परस्पर परप्रांतीय कामगारांची खुलेआम भरती प्रक्रिया सुरू केली आहे. ही एक प्रकारे प्रकल्पग्रस्तांची घोर फसवणूक आहे. जेएनपीएने याआधीही खासगीकरण करताना विविध कंपन्यांशी केलेल्या करारामध्ये कामगार भरती स्थानिक प्रकल्पग्रस्तांमधूनच करावी अशी तरतूद केली होती. या कंटेनर टर्मिनलच्या खासगीकरण प्रक्रियेतही जुन्या कराराप्रमाणे तरतूद आहे, मात्र तरीही स्थानिक प्रकल्पग्रस्तांना डावलून न्हावा-शेवा फ्री पोर्ट कंटेनर टर्मिनलमध्ये परस्पर परप्रांतीय कामगारांची भरती सुरू केली आहे. भरतीमध्ये डावलण्यात येत असल्याने स्थानिक प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र असंतोष खदखदत आहे.

### ...अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा

या गंभीर प्रकरणाकडे जातीने लक्ष घालून मे. जे. एम. बक्षी कंपनीला त्यांनी चालवलेली थेट कामगार भरती प्रक्रिया ताबडतोब बंद करून कामगार भरती फक्त जेएनपीए प्रकल्पग्रस्तांमधूनच करण्याचे आदेश द्यावेत. अन्यथा जेएनपीए प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जेएनपीटी वर्कर्स युनियनचे सरचिटणीस तथा माजी कामगार ट्रस्टी रवींद्र पाटील यांनी जेएनपीए अध्यक्ष संजय सेठी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



पनवेल : भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि श्रावणी सोमवारनिमित्त श्री विरुपाक्ष महादेव मंदिर येथे दीपोत्सव व महाआरती आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाली. या वेळी श्रीनंद पटवर्धन, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, भाजप शहर सरचिटणीस अमरिश मोकल, गुरुनाथ लोंढे, महेंद्र गोडबोले, प्रसाद कर्वे, तुषार पाटील, मकरंद बापट, अनिमेश पटवर्धन, सोहन जोशी व श्री विरुपाक्ष महादेव मंदिरचे सर्व विश्वस्त उपस्थित होते.



पनवेल : देशाचे माजी पंतप्रधान व भाजपचे ज्येष्ठ नेते, भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, अशोक साळुंखे, पांडुरंग पाटील, मयूर कदम, रवींद्र कोरडे, मोतीलाल कोळी, जीवन टाकले, दीपक दुर्गे, चंद्रकांत नाईक, अशोक आंबेकर आदींनी अभिवादन केले.

# खारघरमधील रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

युवा प्रेरणा सामाजिक संस्था व माहेश्वरी प्रगती मंडळ, खारघर यांच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत टाटा कॅन्सर हॉस्पिटलमधील रुग्णांसाठी सलग बारावे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ८१ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला, तसेच परिसरातील नागरिकांसाठी साईदृष्टी डव्हान्स सेंटर फॉर परफेक्ट व्हिजन, सानपाडा या हॉस्पिटलच्या वतीने मोफत नेत्र चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते.



नेत्र चिकित्सा शिबिरात डॉ. राजपाल उसनाळे यांनी अनेक नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी केली व डोळ्या संबंधित आजारांबद्दल मार्गदर्शन केले. शिबिरात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते रक्तदात्यांना सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. मान्यवरांनी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी पुढाकार घेऊन आयोजित केलेल्या या शिबिरास व सामाजिक कार्याबद्दल त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी युवाप्रेरणा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण पाटील, दिलीप जाधव, भरत कोंढाळकर, कुणाल देवकर, गोपाल राजपूत, संदीप ठाकरे, ललित बडोदेकर, आदित्य हाटगे माहेश्वरी प्रगती मंडळ खारघरचे जय डागा, आशीष मनीयार, सतीश मुंदडा, मंगेशजी सिकची, अमित भांगडे, सचिन सोनी, आशीष शारदा, डॉ. राकेश सोमानी, गीतेश कोठारी सोमन मालाणी आदींनी आयोजनासाठी मेहनत घेतली.

### ट्रेलरची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**पनवेल :** एका भरधाव ट्रेलरची मोटरसायकलला पाठीमागून धडक बसल्याने झालेल्या अपघातात मोटर सायकलवरील दोघेजण जखमी झाले. पनवेल जवळील गव्हाण फाटा बस स्टॉप जुना पनवेल ते उरण मार्गावर ही घटना घडली. मोटरसायकलवरून बादलकुमार शाकेत (वय २५) व त्याचा नातेवाईक रवींद्रकुमार सिंह (वय ३०) हे दोघे जात असताना पाठीमागून एका ट्रेलरची त्यांच्या गाडीस धडक बसली. झालेल्या अपघातात हे दोघे जखमी झाल्याने व अपघातानंतर ट्रेलरचालक ट्रेलरसह पळून गेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



पनवेल : सुर नवा ध्यास नवा कलर्स मराठी या वाहिनीवरील टॉप ७मध्ये शिवाजीनगरची सुकन्या श्वेता सुरेश ठाकूर हीची निवड झाल्याबद्दल तिचा गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी 'सुर नवा ध्यास नवा'चे आरोही, कल्याणी, मयुरी, शुभम, उत्कर्ष, नवाब हे स्पर्धक उपस्थित होते.

# कामोठ्यात डान्स स्टुडिओ सुरू

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून कामोठे सेक्टर २० येथे साहिल शहा यांनी डान्स स्टुडिओ सुरू केले आहे. या स्टुडिओचे भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उदघाटन झाले. या वेळी त्यांनी साहिल शहा यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमावेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक गोपीनाथ भगत, विकास घरत, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, आदित्य भगत, रामकृष्ण वाढवणे, सागर ठाकरे, गणेश शिर्सेकर, अभिजित राऊत आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय येथे भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. याच महोत्सवाचा परमोच्च बिंदू म्हणजे १५ ऑगस्ट रोजीचे शानदार ध्वजारोहण. हा ध्वजारोहणाचा सोहळा महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य संजय पाटील यांच्या हस्ते झाला. या वेळी भाजपचे खारघर शहराध्यक्ष ब्रिजेश पटेल यांची उपस्थिती होती, तसेच महाविद्यालयाचे विकास मंडळाचे सदस्य प्रभाकर जोशी व दीपक शिंदे हे उपस्थित होते.



या वेळी इतर मान्यवर सचिन वासकर व जयदास तेलवणे यांनी देखील उपस्थित राहून कार्यक्रमाला शोभा आणली. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड व विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. अंतर्गत गुणवत्ता कक्षचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे, डीएलएलईचे समन्वयक प्रा. महेश धायगुडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. प्रथमेश ठाकूर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. राहुल कांबळे इतर सर्व विभाग प्रमुख, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

ध्वजारोहण झाल्यानंतर महाविद्यालयातील व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीते व नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सफीना मुकादम यांनी केले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे या सर्वांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात ध्वजारोहण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातही स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजता केला गेला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य संजय पाटील हे होते. संजय पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणाद्वारे स्वंतत्र चळवळीला उजाळा दिला. भाजप शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, प्रभाकर जोशी, सचिन वासकर, दीपक शिंदे, निशा नायर, प्राचार्य रूपेंद्र गायकवाड आदी उपस्थित होते.

# वास्तुतज्ज्ञ आनंद पिंपळकर यांना हुतात्मा हिरवे गुरुजी समाजभूषण पुरस्कार



**पनवेल : प्रतिनिधी**

हुतात्मा हिरवे गुरुजी समाजभूषण पुरस्कार हा नामदेव शिंपी समाज युवक संघ, महाराष्ट्र यांच्या वतीने दरवर्षी १५ ऑगस्टला (स्मृतिदिनी) प्रदान करण्यात येतो. या पुरस्काराचे हे चौथे वर्ष होते. यंदा हा पुरस्कार पुणे येथील प्रसिद्ध वास्तुतज्ज्ञ व ज्योतिष विद्यावाचस्पती आनंद पिंपळकर यांना हुतात्मा हिरवे गुरुजी स्मारकात आमदार प्रशांत ठाकूर यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

या वेळी शिंपी समाजातील कर्तृत्ववान, यशस्वी समाजरत्नाचा सन्मान हा पनवेलचे सुपुत्र हुतात्मा हिरवे गुरुजी यांचे नावे पुरस्कार देऊन नामदेव शिंपी समाज युवक संघ करत असल्याचा अभिमान वाटतो, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

संघाचे अध्यक्ष सिद्धेश हिरवे यांचे हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. नागेश हिरवे यांनी सत्कारमूर्तींना गोवा मुक्ती संग्रामाची पुस्तिका भेट दिली. या वेळी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष पी. बी. कुंभार, हभप विशाल महाराज हाडवळे, स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटना अध्यक्ष परशराम गोडबोले, बाबासाहेब चिमणे, रवींद्र कालेकर, राष्ट्रीय जनसेना पार्टी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अशोक खैरनार, नामदेव शिंपी समाज पनवेलचे अध्यक्ष विनायक नाजरे, उद्योजक सुभाष पांढरकामे, योगिता मांढरे, अरुणा हिरवे, समस्त शिंपी समाज परिषदेचे अध्यक्ष रामचंद्रजी होमकर आदी उपस्थित होते.

### जेएनपीए-धुतूम रस्त्यावर कारचा टायर फुटून अपघात

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जेएनपीए-धुतूम रस्त्यावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या कारचा टायर फुटल्याने अपघात होण्याची घटना घडली असून सदर अपघात हा द्रोणागिरी नोड येथील उड्डाणपूलावर झाला.



उरण वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ अधिकारी अशोक गायकवाड यांनी तातडीने वाहतूक कोंडी होणार नाही. याची खबरदारी घेतली आहे, तर वाहनचालकास दुखापत न होता सुखरूप असल्याचे सांगितले आहे.

सकाळी ९च्या सुमारास धुतूमकडून जेएनपीए-उरणच्या दिशेने एक कार भरधाव वेगाने जेएनपीए-धुतूम महामार्गावरून जात होती. कारचा टायर फुटल्याने कार रस्त्यावर उलटली. या अपघातात कारचालक थोडक्यात बचावला आहे. अपघाताचे गांभीर्य ओळखून कार चालकास सुखरूप बाहेर काढले आहे.

कारचा टायर कशा मुळे फुटला याचे कारण तत्काळ समजू नसले तरी वाहतूकीच्या सर्व नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलीस अधिकारी अशोक गायकवाड यांनी केले आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३२


**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. भारताला आपल्या गरजेच्या इतके टक्के इंधनाची आयात करावी लागते?**
***अ.*** १०० टक्के ***आ.*** ८५ टक्के ***इ.*** ६० टक्के ***ई.*** ५० टक्के

**२. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी फेब्रुवारी २०१९ पासून देशातील किती शेतकरी कुटुंबांना मिळतो आहे?**
***अ.*** १२ कोटी ***आ.*** ५ कोटी
***इ.*** ८ कोटी ***ई.*** १० कोटी

**३. जगातील सुमारे शंभर देशांना मोटारींची निर्यात करणारी भारतीय कंपनी कोणती?**
***अ.*** टाटा मोटर्स ***आ.*** बजाज
***इ.*** मारुती सुझुकी ***ई.*** महिंद्रा अँड महिंद्रा




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# पुन्हा युतीचे अधिवेशन

देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा दमदार नेता सरकार पक्षाकडे मौजूद आहे. अधिवेशनात विरोधकांचे सर्व हल्ले परतवून लावण्यास एकटे फडणवीस समर्थ आहेत. सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो जनतेच्या कामांचा. ती मात्र आता खऱ्या अर्थाने मार्गी लागतील हे नक्की.

महाराष्ट्रातील सत्तांतरानंतर चाळीस दिवसांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला वीस मंत्री मिळाले आणि अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला या सरकारचे खातेवाटपही पार पडले. महाराष्ट्राच्या दृष्टीने हा एक अमृतयोगच म्हणावा लागेल. अडीच वर्षांच्या निरर्थक राजकीय उठाठेवीनंतर राज्यात पुन्हा एकदा लोकाभिमुख आणि कार्यक्षम सरकार आले आहे. ठाकरे सरकारच्या अडीच वर्षांच्या कारकीर्दीला निरर्थक राजकीय उठाठेव म्हणण्यात गैर काही नाही. कारण गेल्या अडीच वर्षांत महाराष्ट्राची सर्वच आघाड्यांवर पिछेहाट झाली. ठाकरे सरकारचे बव्हंशी दिवस पोकळ घोषणांमध्ये आणि स्वत:च्या खुर्च्या वाचवण्याच्या उद्योगात अक्षरश: वाया गेले होते. या सरकारने जे काही तोडकेमोडके निर्णय घेतले, त्यातले बहुतेक निर्णय न्यायालयात टिकले नाहीत. उर्वरित सगळा आनंदी आनंदच होता. या पार्श्वभूमीवर शिंदे-फडणवीस सरकारचा शुभारंभ झाला असून त्याचे स्वागतच करायला हवे. खातेवाटपामध्ये भारतीय जनता पक्षाचा वरचष्मा ठळकपणे दिसत आहे यात शंका नाही. परंतु अधिवेशनानंतर होणाऱ्या संभाव्य विस्तारानंतर मंत्रिमंडळाचे संतुलन नीट राखले जाईल असे दिसते. आता सत्तारूढ झालेले सर्वच्या सर्व म्हणजे वीस मंत्री हे कॅबिनेट दर्जाचे आहेत. मंत्रिमंडळ विस्तारानंतर आमच्याकडील काही खाती शिंदे यांच्या शिवसेनेकडे जाऊ शकतात. किंवा त्यांच्याकडील एखाद दुसरे खाते आमच्याकडे येऊ शकेल असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच सूचित केले आहे. शिवसेनेच्या शिंदे समर्थक आमदारांनी खातेवाटपाबाबत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या नाराजीचा राग आळवला असला तरी त्यातून काही निष्पन्न होण्याची शक्यता कमीच आहे. कारण ही नाराजी मंत्रिपदाच्या हव्यासापोटी आलेली नाही. तसे पाहू गेल्यास कुठलेही खाते बिनमहत्त्वाचे नसते. खाते कुठले, यापेक्षाही त्या खात्यामार्फत समाजाचे आपण काय भले करू शकतो हे अधिक महत्त्वाचे असते. खातेवाटप पार पडल्यामुळे उद्या बुधवारपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळ अधिवेशनात चांगली रंगत येईल अशी अपेक्षा आहे. शिंदे-फडणवीस यांच्या दिमतीला आणखी दीड डझन मंत्री आले असले तरी विरोधी बाकांवर सरकार चालवण्याचा मोठा अनुभव असलेले मातब्बर नेते असतील. साहजिकच शिंदे-फडणवीस सरकारवर जोरदार हल्ले होणार अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे ठरणार नाही. सरकारला धारेवर धरणे हे विरोधीपक्षांचे कर्तव्यच असते. अर्थात विरोधी बाकांवर एरव्ही अधिवेशन गाजवू शकला असता असा शिवसेना पक्ष जवळपास फुटला आहे. ठाकरे समर्थक गटाची विधिमंडळातील ताकद अतिशय क्षीण झालेली आहे. त्यामुळे विरोधी बाकांवरून त्यांच्याकडून होणारे हल्ले शक्तीहीन असतील हे वेगळे सांगायला नको. काँग्रेस पक्षाची अवस्था तर पहिल्यापासूनच दुर्बळ आहे. राहता राहिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. विरोधी पक्षाची सारी मदार राष्ट्रवादीचे नेते अजित पवार, छगन भुजबळ, जयंत पाटील यांच्या खांद्यावर राहणार आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सर्वपक्षीय चहापानाचा एक कार्यक्रम ठरलेला असतो. त्यावर विरोधी पक्षाने बहिष्कार घालायचा ही देखील परंपराच ठरू पाहात आहे. त्यानुसार विरोधीपक्षांनी कुठलेही ठोस कारण नसताना चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याची घोषणा केली. अर्थात यामुळे शिंदे- फडणवीस सरकारचे फारसे काही बिघडणार नाही हेही तितकेच खरे.

# रस्ते अपघात कसे टाळता येतील?



**रोड हिप्नोसिस...**

*रोड संमोहन ही एक शारीरिक स्थिती आहे, ज्याची बहुतेक चालकांना माहिती नसते. रस्त्यावर वाहन चालवितांना साधारणपणे २.५ तासांनी रोड हिप्नोसिस सुरू होते. संमोहीत चालकाचे डोळे उघडे असतात, पण मेंदू क्रियाशील राहत नाही आणि डोळा काय पाहतो त्याचे विश्लेषण करत नाही. परिणाम रोड हिप्नोसिस घडून येते. तुमच्यासमोर उभ्या असलेल्या वाहनाला किंवा ट्रकला मागील बाजूस धडकून अपघात होतो. रोड हिप्नोसिस असलेल्या ड्रायव्हरला टक्कर होईपर्यंत शेवटच्या १५ मिनिटांत काहीही आठवत नाही. तो कोणत्या वेगाने जात आहे, किंवा समोरून येणाऱ्या गाडीच्या वेगाचे विश्लेषण करू शकत नाही. सहसा टक्कर १४० कि. मी. पेक्षा जास्त वेगाने असते. रोड हिप्नोसिसपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी दर २.५ तासांनी चालकाने थांबावे, चहा किंवा कॉफी घ्यावी, थोडी विश्रांती घ्यावी, ५-६ मिनिटे चालावे आणि आपले मन मोकळे ठेवावे. जर तुम्हाला वाहन चालविताना शेवटच्या १५ मिनिटांतील काहीही आठवत नसेल, तर याचा अर्थ तुम्ही स्वत:ला आणि सहप्रवाशांना मृत्यूकडे नेत आहात. रोड संमोहन हे सहसा रात्रीच्या वेळी घडते.*

**-डॉ. श्रीकांत गुंडावार, रेडिओलॉजिस्ट, पुणे**

**खबरबात**
**नितीन देशमुख**

रविवारी सकाळ उजाडली ती, मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे आणि शिवसंग्राम पक्षप्रमुख विनायक मेटे हे त्यांच्या अपघाती निधनाची बातमी घेऊनच. काही वेळातच त्यांच्या निधनाची बातमी सर्वदूर पोचली आणि सारे जण सुन्न झाले. अपघातानंतर मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील अपघाताबाबत अनेक मुद्दे पुढे आले आहेत. दरम्यान, अपघाताच्या चौकशीचे आदेश तातडीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

विनायक मेट हे इंडिव्हर गाडी (क्रमांक एम एच-०१, डिपी-६३६४) मधून पुणेकडून मुंबईकडे पहाटे पाचच्या सुमारास जात होते. पनवेलजवळ कि. मी. नंबर १५/९०० या ठिकाणी त्यांची गाडी आली आणि गाडीला भीषण अपघात झाला. अपघातात मेटे हे गंभीर जखमी होऊन त्यांचा त्यात मृत्यू झाला. त्यांचा बॉडीगार्ड राम ढोबळे हासुद्धा गंभीर जखमी झाला आहे. गाडी चालक एकनाथ कारभारी कदम हा जखमी झाला आहे. मेटे यांच्या डोक्याला आणि हाताला गंभीर दुखापत झाली होती. विनायक मेटे यांना पनवेलला एमजीएम रुग्णालयात दाखल केल्यावर त्यांचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. दरम्यान, त्यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी गंभीर आरोप केला आहे. नक्की काय झाले हे मला माहित नाही, पण आपल्या पतीचा अपघात झाल्यानंतर त्यांना लगेच रुग्णालयात आणले गेले नाही. त्या पुढे असेही म्हणाल्या, याबाबत मी चौकशीची मागणी करणार आहे. मला अपघात कसा झाला हे कळणे गरजेचे आहे. अपघात नेमका कसा घडला आणि आम्हाला किती वेळानंतर माहिती देण्यात आली या गोष्टींची आम्हाला माहिती मिळाली पाहिजे. अँब्युलन्ससचा नंबर संगळ्यांकडे असतो. ड्रायव्हर फोन करु शकला असता, तो आम्हाला अपघाताचे नेमके लोकेशन देत नव्हता असा धक्कादायक आरोप ज्योती मेटे यांनी केला आहे. त्याने जर आम्हाला लोकेशन दिले असते तर आम्ही वैद्यकीय मदत पाठवू शकलो असतो. त्यामुळे मी चौकशीची मागणी करणार असल्याचेही ज्योती मेटे म्हणाल्या.

दरम्यान, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे वर टोलचे पैसे वाढवतात पण अपघात झाल्यावर वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध होत नाही. फक्त टोल वसुली, सुविधा शून्य अशी परिस्थिती झाल्याचे अनेकांच्या तक्रारी येत आहेत. मुंबई-पुणे एक्स्प्रेस रोडवर अपघात झाला तर त्या ठिकाणी रुग्णवाहिका कधीच वेळेवर येत नाही, मात्र खासगी रुग्णवाहिका आली तरी आधी पैसे मगच अपघातग्रस्त व्यक्तीला रुग्णवाहिकेमध्ये घेतले जाते असे प्रकार घडत आहेत असल्याचे अनेक वेळा अपघातग्रस्तांचे नातेवाईकच तक्रार करतात. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर वाहतूक पोलीस ही या खासगी रुग्णवाहिकेलाच पाठिंबा देतात आणि अपघात झालेल्या नातेवाईकांना सांगतात की, त्याला पैसे द्या माणूस कोणत्या टेन्शनमध्ये असतो तेही कळत नाही. मात्र रुग्णवाहिका चालकांकडून अजिबात सहकार्य केले जात नसल्याचे सांगितले जाते. याबाबत टोल वसूल करणाऱ्या कंपनीने लक्ष देणे गरजेचे आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर अनेक अपघात झाले, मात्र कधीच या रुग्णवाहिकांबाबत ठोस निर्णय घेतला जात नाही. नवी मुंबईतील डॉ. वैभव झुंजारे कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाला होता. तेव्हा ही रुग्णवाहिका वेळेवर आल्या नाही. रुग्णवाहिका चालक फक्त पैसे पैसे करत असतात. पैसे तर दिलेच पाहिजे, मात्र थोडा वेळ लागतो कारण प्रवास करताना जास्त पैसे कोण सोबत ठेवत नाहीत. नातेवाईक येईपर्यंतही थांबत नाहीत असा अनेकांचा अनुभव आहे. पोलिसांच्या १०० नंबरबाबत तर विचारूच नये तो कधी लागतच नाही. चुकून लागला तर समोरील कर्मचाऱ्याला आणि फोन करणाऱ्यालाही अनेक वेळा या रस्त्याबाबत फारशी माहिती नसते. त्यामुळे उलट-सुलट प्रश्न विचारण्यात वेळ जातो. त्यामध्ये वेळ जातो भीक नको, पण कुत्रा आवर अशी परिस्थिती होते. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करताना प्रशासनाने याबाबत ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे.

पोलीस मोबाईल लोकेशनच्या मदतीने आरोपीचा ठावठिकाणा शोधून काढतात तसे अपघातचे ठिकाण शोधू शकतात. त्यासाठी शासनाने त्यांना आवश्यक यंत्रणा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. या सगळ्याबरोबरच रस्त्यावरून गाडी चालविणाऱ्यांनी ही खबरदारी घेणे गरजेचे आहे.

रात्री उशिरा निघाल्यावर जेवल्या नंतर चालकाच्या डोळ्यावर झोप येते. कधी कधी अनेक तास गाडी चालविल्यामुळे चालकाला रोड हिप्नोसिस होऊ शकतो. विनायक मेटे हे रात्री ११.३० नंतर बीडहून निघाल्याचे समजते. अपघात पहाटे ५.३० वाजता झाला. त्यामुळे चालकाला डुलकी लागली असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी रेल्वे सारखी हॉर्न वाजण्याची सुविधा गाडीत नसल्याने अपघात होऊन त्यात जिवीतहानी होऊ शकते. यासाठी प्रवासाला निघताना स्वत:च खबरदारी घेणे आवश्यक आहे. दरम्यान, अपघात घडल्यानंतर चर्चा होते, मात्र ते टाळता येतील याबाबत काळजी घेणेही तेवढेच गरजेचे आहे.



## बदलते तंत्रज्ञान



### ऑनलाइन शॉपिंग करताना 'या' गोष्टी लक्षात ठेवा!

सणासुदीच्या हंगामाला ऑगस्टपासूनच सुरुवात झाली आहे. काही कंपन्यांनी ऑनलाइन शॉपिंग साइट्सनीही वेगवेगळ्या ऑफर आणल्या आहेत. येत्या काही महिन्यात, या शॉपिंग साइट्सवर इतर अनेक प्रकारच्या विक्रीचे आयोजन केले जाईल. ज्यामध्ये तुम्हाला अनेक ऑफर, सवलत, कूपन, कॅशबॅक आणि मोफत भेटवस्तूदेखील मिळतील. या सेलमध्ये अनेकजण नवीन उत्पादने घेण्याचा विचार करतात. पण ऑनलाइन शॉपिंग करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा मोठ्या फसवणुकीला बळी पडू शकता.

तुम्हीदेखील फ्लिपकार्ट किंवा इतर कोणत्याही ई-कॉमर्स साइटवरून काहीतरी नवीन खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर तुम्ही खालील मुद्दे जरूर वाचा. तुम्ही शॉपिंग साइटचे होम पेज उघडताच, तुम्हाला ८० टक्क्यांपर्यंत सूट किंवा १५,००० रुपयांपर्यंतचा कॅशबॅक मिळेल अशा ओळी असतात. या ओळी वाचूनच लोक उत्साहित होतात आणि लवकरात लवकर त्या वस्तू खरेदी करण्याचा प्रयत्न करतात. पण इथे अप टू लक्ष न दिल्याने मोठे नुकसान होऊ शकते.

खरेदीवेळी कोणत्याही उत्पादनावर उपलब्ध असलेल्या ऑफर 'कार्ट' मध्ये ठेवण्यापूर्वी ते समजून घेणेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. विविध बँक कार्डे, वॉलेट आणि युपीआय पेमेंट वेगवेगळे फायदे देतात, त्यामुळे खरेदी करण्यापूर्वी या सर्व ऑफरसह पुढे जाणे शहाणपणाचे ठरेल. मोठ्या सवलती किंवा प्रचंड कॅशबॅक पाहून लोक खरेदी सुरू करतात पण त्या फायद्यासाठी आवश्यक असलेल्या 'टर्म्स आणि कंडिशन' कडे अनेकदा दुर्लक्ष करतात, ज्याचा परिणाम त्यांना नंतर सहन करावा लागतो. ऑनलाइन शॉपिंगमध्ये अशा अनेक अटी आणि नियम जारी केले जातात, जे खरेदी करण्यापूर्वी काळजीपूर्वक वाचणे आणि समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सवलत दिली जाते, याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

# प्रसिद्ध ग्रंथसूचिकार शंकर दाते

**निमित्त**

शंकर गणेश दाते यांचा जन्म १७ ऑगस्ट या दिवशी रत्नागिरी येथे झाला. हे एक मराठी लेखक, सूचिकार होते. इ.स. १८०० ते पुढे १५० वर्षांच्या कालखंडात प्रकाशित झालेल्या मुद्रित मराठी ग्रंथांची विषयवार सूची त्यांनी दोन भागांत तयार करून प्रकाशित केली. या दोन्ही खंडांत मिळून २६६०७ इतक्या मराठी ग्रंथांची नोंद झालेली आहे. त्यांच्या एकूणच कार्याचा घेतलेला हा थोडक्यात आढावा.

मराठी ग्रंथसूचीव्यतिरिक्त त्यांनी मराठी लोककथांचे संकलन केले आणि ग्रंथालयशास्त्रावर पुस्तके लिहीली. त्यांनी भारतीय साहित्याची राष्ट्रीय ग्रंथसूची १९०१-१९५१ भाग ३ या ग्रंथातील मराठी विभागाचे संपादनही केले. दाते यांचे मूळ घराणे राजापूर तालुक्यातील अडिवरे येथील आहे. त्यांचे वडील हे मुंबईच्या कुलाबा वेधशाळेत हेडक्लार्क या पदावर काम करत होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी व्यापारात चांगले यश मिळवले. पण १९१४ साली त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर दाते यांचे काका आणि मोठे बंधू यांनी दाते यांचा सांभाळ केला. पुणे येथील स. प. महाविद्यालयातून दाते यांनी मराठी आणि संकृत या विषयात पदवीसाठी नाव नोंदविले होते. पण लोकसाहित्य या विषयाची आवड निर्माण झाल्याने ते त्या विषयाकडे वळले आणि त्यांनी लोककथांचे संकलन प्रकाशित केले.

शंकर दाते यांनी १९३४ साली मराठीतील प्रकाशित ग्रंथांची विषयवार सूची करण्याचे काम हाती घेतले आणि २७ वर्षे कष्ट करुन ते काम १९६१ साली पूर्ण केले. त्यानंतर मराठी नियतकालिकांची सूची करण्याचे त्यांनी ठरवले होते. त्यासाठीची सामग्रीही जमवली होती. मात्र तत्पूर्वीच कर्करोगाने त्यांचे निधन झाले. त्यामुळे मराठी नियतकालिकांची सूची बनविण्याचे त्यांची इच्छा अपूर्ण राहिली.

त्यांनी १५० वर्षांतील मराठी ग्रंथांची विषयवार आणि शास्त्रीय पद्धतीने सूची करून त्यांनी प्रकाशित केली. तसे करताना दाते यांनी सूचीत नोंदवलेले प्रत्येक पुस्तक पाहून मग त्याची नोंद करण्याचे धोरण स्वीकारले होते. मराठी ग्रंथसूची हे मराठी भाषेत कोणकोणत्या विषयावर कोणकोणते ग्रंथ प्रकाशित झाले हे जाणून घेण्यासाठीचे उपयुक्त साधन आहे.

ग्रंथसूचीत ग्रंथाविषयी त्यांनी माहिती दिली आहे. यामध्ये मराठी ग्रंथसूचीत प्रत्येक ग्रंथाविषयी पुढीलप्रमाणे माहिती नोंदविलेली आढळते. यामध्ये ग्रंथकाराचे नाव, ग्रंथाचे नाव, आवृत्ती, प्रकाशनस्थळ, प्रकाशक, पृष्ठसंख्या, आकार, चित्रांची माहिती, मूल्य या माहितीसोबतच मुद्रक आणि मुद्रणस्थळ ही माहितीही या सूचीत नोंदविलेली आहे. सूचीमुळे वाचकांबरोबरच अभ्यासकांनाही याचा चांगला फायदा होतो.

तसेच यामध्ये ग्रंथाविषयीची महत्त्वाची इतर माहिती दिली आहे. उदा. अनुवादित ग्रंथ असल्यास मूळ ग्रंथ, ग्रंथकार इ. टिपेत नोंदविलेली आहे. प्रत्येक ग्रंथाविषयीची ही माहिती ग्रंथ-वर्णन-कोश या विभागात विषयवार विभागून देण्यात आली आहे. नोंदींच्या वर्गीकरणासाठी ग्रंथालयशास्त्रात वापरण्यात येणारी मेलविल डयुई यांची दशांश-वर्गीकरण-पद्धती वापरली आहे. काही ठिकाणी उदा.चरित्रे काही विशेष शिर्षकांचा वापर करून त्याविषयीचे सर्व ग्रंथ एकत्र सापडण्याची सोय केली आहे. उदा. शिवाजी महाराजांची सर्व चरित्रे. सूचीच्या प्रारंभी दशांश-वर्गीकरण-पद्धतीचे वर्ग आणि उपवर्ग यांची माहिती देण्यात आली आहे. तसेच सूचीच्या शेवटी लेखकाचे नाव, ग्रंथाचे नाव, विशेष शीर्षक यांच्या निर्देशसूची दिलेल्या असून त्यायोगे सूचीतील ग्रंथ शोधण्याची सोय करून दिलेली आहे. दरम्यान, १० डिसेंबर, १९४२ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांनी केलेल्या ग्रंथसूचीमुळे फार मोठा उपयोग झाला आहे. दरम्यान, सूची ज्ञानसंचयाच्या दिशा वस्तुनिष्ठपणे दाखवण्याचे कार्य करते. कोश आणि सूची या दोहोंतही नव्या ज्ञानाची निर्मिती किंवा नवे प्रतिपादन नसते. या दोहोंचेही स्वरूप मुख्यतः संकलनात्मक स्वरूपाचे असते. अर्थात कोश व सूची यांचे स्वरूप काल ओघात विकसित होत राहणारे असल्याने त्यांचे स्वरूप काही प्रमाणात लवचिक असू शकते. मात्र त्या काळात ग्रंथसूचींचे अभ्यासपूर्ण काम करणाऱ्या व्यक्ती कमी होत्या, अशा काळात दाते यांनी महत्त्वपूर्ण काम करुन अभ्यासकांसाठी महत्त्वपूर्ण काम केले आहेच, याशिवाय त्यांनी एक लेखक म्हणूनही नाव मिळविले आहे.

**-साभार विकिपीडिया**

**क्लिक...क्लिक...!**



**नवी मुंबई : भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सर्वत्र साजरा होताना महानगरपालिकेचे ईटीसी अपंग शिक्षण प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्रही तिरंगी सजावटीचे झळाळून निघाले होते. विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबवून राष्ट्रभक्तीचे अनोखे दर्शन घडविले. आकर्षक विविध रांगोळ्याही या वेळी त्यांनी रेखाटल्या होत्या.** (छाया : सिद्धेश प्रधान)

## आरोग्य प्रहर



### जेवताना पाणी प्यायल्याने वजन वाढते का? जाणून घ्या माहिती..

पाणी शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी अत्यंत गरजेचे असते. त्यामुळे योग्य प्रमाणात पाणी पिणे निरोगी शरीरासाठी आवश्यक आहे. सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. तसेच योग्य प्रमाणात पाणी प्यायल्याने वजन कमी होण्यास मदत होते. हृदयापासून त्वचेपर्यंत सर्व अवयवांना निरोगी ठेवण्यासाठी पाणी महत्त्वाची भूमिका बजावते. अशाप्रकारे वेगवेगळ्या पद्धतीने शरीरासाठी उपयुक्त ठरणारे पाणी जेवताना प्यायचे की, नाही हा प्रश्न बऱ्याच जणांना पडतो. जेवताना पाणी प्यायल्याने काय होऊ शकते जाणून घेऊया.

निरोगी शरीरासाठी दिवसभरात ३ ते ४ लिटर पाणी पिणे आवश्यक असते. पाण्यामुळे शरीरातील हानीकारक पदार्थ शरीराबाहेर टाकले जातात. जरी पाण्याचे अनेक फायदे असले तरी जेवताना पाणी प्यायल्यास शरीरासाठी ते कधी कधी नुकसानदायक ठरू शकते. आयुर्वेदानुसार जेवताना पाणी प्यायल्याने पचनक्रिया बिघडू शकते आणि वजनदेखील वाढू शकते. यावर तज्ज्ञांचे काय मत आहे हे जाणून घेऊया.

पाणी अन्नाचे विघटन करण्यास मदत करते, जेणेकरून पोषक तत्त्वे आपल्या शरीरामध्ये नीट शोषली जातील. काहीजण पचनक्रियेशी संबंधित समस्यांमुळे जेवताना पाणी पिणे टाळतात. पण तज्ज्ञांच्या मते जेवताना आपण थोडे पाणी पिऊ शकतो. ते शरीरासाठी हानिकारक नाही. तसेच जेवताना थोडे पाणी प्यायल्याने वजन वाढत नाही.

जेवताना साधे पाणी पिण्यापेक्षा त्यामध्ये लिंबू पिळल्यास ते अधिक फायदेशीर ठरते. कारण त्यात भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी आणि कॅल्शियम असते. अशाप्रकारे तुम्ही जेवताना थोड्या प्रमाणात पाणी पिता येऊ शकता. त्यामुळे वजन वाढण्याची शक्यता नाही. पाणी पेशींना पोषक तत्वे आणि ऑक्सिजनचा पुरवठा करण्यास मदत करते. मुबलक प्रमाणात पाणी प्यायल्याने पचनक्रिया निरोगी राहते. पाण्यामुळे शरीर हायड्रेटेड राहते, परिणामी शरीर निरोगी राहते. पाण्याचे योग्य प्रमाणात सेवन केल्याने रक्तदाब स्थिर राहण्यास मदत होते. दरम्यान, येथे देण्यात आलेली माहिती गृहीतके आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. अधिक महितीकरिता तज्ज्ञांचा सल्ला जाणून घ्या.

# स्व. अटलबिहारी वाजपेयींना कर्जत भाजपकडून अभिवादन

**कर्जत : बातमीदार**

देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कर्जत भाजपकडून मंगळवारी (दि. १६)त्यांना अभिवादन करण्यात आले. भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव सुनील गोगटे यांच्या कार्यलयात स्व. वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांनी या वेळी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. कर्जतचे उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, भाजप किसान मोर्चाचे सुनील गोगटे, भाजप महिला मोर्चा कर्जत तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे, भाजप कर्जत शहर सरचिटणीस प्रकाश पालकर, माजी शहराध्यक्ष दिनेश सोळंकी, शहर उपाध्यक्ष शर्वरी कांबळे, स्वप्ना सोहोनी, विजय कुलकर्णी, मारुती जगताप, सूर्यकांत गुप्ता, अभिनय खांगटे, सर्वेश गोगटे, निलेश लांडगे, सरमळकर, फैझान पटेल यांच्यासह कार्यकर्ते या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# आमदार रविशेठ पाटील यांचा वाढदिवस उत्साहात

## पेणमध्ये विविध विकासकामांचे लोकार्पण, भूमिपूजन





**पेण : प्रतिनिधी**

भाजप आमदार रविशेठ पाटील यांचा वाढदिवस सोमवारी (दि. १५) मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. या वेळी पेण नगर परिषदेच्या वतीने आयोजित विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

पेण नगर परिषदेच्या वतीने बांधण्यात आलेले मच्छीमार्केट आणि दलितवस्तीसाठी बांधण्यात येत असलेल्या समाजमंदिर जागेचे लोकापर्ण तसेच म्हाडा कॉलनी येथील पाणी साठवण टाकीच्या बांधकामाचे भूमिपूजन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

पेणच्या माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील, माजी उपनगराध्यक्षा वैशाली कडू, प्रशासक जीवन पाटील, माजी गटनेते अनिरुध्द पाटील, माजी नगरसेविका शहनाज मुजावर, देवता साकोस्कर, ॲड. तेजस्विनी नेने, अजय क्षीरसागर, दीपक गुरव, उद्योजक रशाद मुजावर, अण्णा कडू, हिमांशु कोठारी, जनार्दन जाधव, दर्शन बाफना, माजी सभापती प्रकाश पाटील, वसुधा पाटील, शोमेर पेणकर, प्रतिभा पाटील, प्रकाश रामाणे, सुनीता जोशी, युवा नेते ललित पाटील, प्रशांत पाटील, भाजप नेते राजेश मपारा, शहर अध्यक्ष हिमांशू कोठारी, मितेश शहा यांच्यासह ज्येष्ठ नागरिक आणि कार्यकर्ते या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांच्या पाठिंब्यामुळे पेण तालुक्याच्या व शहराच्या विकासकामांसाठी आपण मोठ्या प्रमाणात निधी आणू शकलो, असे आमदार रविशेठ पाटील यांनी या वेळी सांगितले. माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. सायंकाळी आमदार रविशेठ पाटील आणि त्यांचा नातू अमोघ ललित पाटील याचा वाढदिवस कुटुंबीयांच्या वतीने वैकुंठ निवासस्थानी केक कापून साजरा करण्यात आला. या वेळी गीतगायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# परखंडे आदिवासीवाडीतील समाजमंदिर कोसळले

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील परखंडे आदिवासी वाडीतील सार्वजनिक समाज मंदिराची एक भिंत जोराच्या वारा पावसात कोसळली. त्यामुळे या समाजमंदिरात ठेवण्यात आलेल्या वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

आदिवासी विकास प्रकल्पाच्या माध्यमातून परखंडे आदिवासी वाडीत दहा-बारा वर्षांपूर्वी सार्वजनिक समाजमंदिर बांधण्यात आले होते. या समाजमंदिराची भिंत खचली होती आणि भिंतीला अनेक ठिकाणी तडे गेले होते, मात्र या समाजमंदिराच्या दुरुस्तीसाठी संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष न दिल्याने जोराच्या वारा-पावसात या समाज मंदिराची भिंत पडली. त्यामुळे या समाजमंदिरात ठेवण्यात आलेल्या आदिवासी बांधवांच्या सार्वजनिक अनेक उपयुक्त वस्तूंचे नुकसान झाले आहे.

याबाबतची माहिती खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांना मिळताच त्यांनी वावोशी मंडळ अधिकारी तुषार कामत यांना घटनास्थळीची पाहणी करण्यासाठी पाठवले, मंडळ अधिकारी कामत यांनी घटनास्थळी भेट देत आदिवासी बांधवांना समाज मंदिरात जाऊ नका, अशा सूचना दिल्या आहेत.

**परखंडे आदिवासी वाडीत जवळपास अडीचशे लोकांची वस्ती आहे. सार्वजनिक कार्यक्रमासाठी या समाज मंदिराचा उपयोग केला जातो. समाज मंदिर पडल्यामुळे आगामी गणपती उत्सव तसेच यापुढील सार्वजनिक कार्यक्रम कुठे करायचे असे प्रश्न वाडीतील आदिवासी बांधवांना सतावत आहेत.**

**-हनुमंत मोरे, ग्रामस्थ, परखंडे आदिवासी वाडी, ता. खालापूर**

**परखंडे आदिवासी वाडीतील सार्वजनिक समाज मंदिर अर्धवट पडले असून, त्याचा पंचनामा करण्यात येत आहे. त्यानंतर याबाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात येईल.**

**-तुषार कामत, मंडळ अधिकारी, वावोशी, ता. खालापूर**



# 'त्या' बालकाची मृत्यूशी झुंज संपली

**नागोठणे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील शेतपळस गावामधील रोहिदास घासे यांचे घर कोसळून त्यात त्यांचा मुलगा रियांश घासे (वय ३) गंभीर जखमी झाला होता. कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारादरम्यान, मंगळवारी (दि. १६) डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

मुसळधार पावसामुळे १२ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजताच्या सुमारास शेतपळस येथील रोहिदास घासे यांच्या घराच्या छताचा भाग रिद्धी घासे (वय ९) व रियांश घासे (वय ३) यांच्यावर अंगावर पडला. त्यात रियांश गंभीर जखमी झाला होता. त्याला पुढील उपचारासाठी कामोठ येथील एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले होते. तेथील डॉक्टरांनी मंगळवारी सकाळी रियांश याला मृत घोषित केले.

# मुरूडमधील आदिवासी बालकांना पौष्टिक आहाराचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील पद्मदुर्ग व्यवसायकरी मंडळाच्या वतीने सोमवारी (दि. १५) विहूर येथील आदिवासी वाडीवरील गरोदर माता, स्तनदा माता व बालकांना पौष्टिक आहाराचे वाटप करण्यात आले. या आहारामध्ये केळी, दूध, बिस्किट व इतर पौष्टिक पदार्थांचा समावेश आहे.

पद्मदुर्ग व्यवसायकरी मंडळाचे अध्यक्ष अरविंद सुरेश गायकर, सचिव दामोदर खैरगावकर, तसेच विस्तार अधिकारी संजय शेडगे, पर्यवेक्षिका शुभांगी कोतवाल, उप अभियंता आशिष मुकणे, दिनेश गायकवाड, राजेंद्र वाडेकर, विस्तार अधिकारी दिनेश गायकवाड, श्रीधर्मा तपसीकर, अंगणवाडी सेविका स्वाती भवई यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात सुमारे १५० बालक व त्यांच्या मातांना पौष्टीक आहाराचे वाटप करण्यात आले.



# रेवस बंदरातील स्वच्छतागृहात पाण्याची गैरसोय


## प्रवाशांचे हाल, मेरिटाईम बोर्डाचे दुर्लक्ष

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्वात जुने प्रवासी बंदर म्हणून ओळखले जाणारे रेवस बंदर एकीकडे कात टाकत असताना तेथील गैरसोयीमुळे प्रवाशांचे मात्र हाल होत आहेत. या बंदरातील स्वच्छतागृहातील पाण्याची सोय बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे पाण्याचा खर्च मेरिटाईम बोर्डाला परवडत नाही का? असा प्रश्न उभा राहत आहे.

सुमारे १००वर्षांहून अधिक जुने असलेले रेवस प्रवासी बंदर कायमच चर्चेत राहिले आहे. कधी या बंदरावरून मुंबईकडे होणाऱ्या जलवाहतूक सोयीच्या प्रवास भाड्यात होणारी वाढ, तर कधी या बंदरावर जाणाऱ्या रस्त्याच्या कामाची संथ गती. आता या बंदरावरील स्वच्छता गृहातील पाण्याची गैरसोय चर्चेचा आणि संतापाचा विषय ठरला आहे.





प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, बंदरावर महिलांसाठी दोन आणि पुरुषांसाठी दोन अशी चार स्वच्छता गृहे नव्याने बांधण्यात आली आहेत. मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या या स्वच्छता गृहांसाठी बंदर विभाग पाणी मागवीत होते, परंतु मागील काही दिवसांपूर्वी ही पाण्याची सुविधा बंद झाली. बंदर विभाग पाणी मागवीत नाही, त्या बाबत प्रवाशांनी माहिती घेतली असता, पाणी मागविणे परवडत नसल्याचे कळले. प्रवासी भाड्यातून लेवी आकारली जाते, मग सुविधा का दिल्या जात नाहीत? असा प्रश्नदेखील प्रवासी उपस्थित करीत आहेत.

पाण्याशिवाय या स्वच्छता गृहाचा वापर कसा करायचा, असा प्रश्न प्रवाशांना भेडसावत आहे. त्यांची कमालीची गैरसोय होत आहे. दरम्यान बंदर विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क न झाल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

रेवस-करंजा रो-रो चे काम वेगात सुरू आहे. त्यामुळे लवकरच प्रवाशांना एक उत्तम पर्याय उपलब्ध होणार आहे. याचे समाधान वाटत असताना, बंदरावर भेडसावत असलेल्या या समस्या प्रवाशांना नाहक त्रासदायक ठरत आहेत. याची दखल बंदर अधिकाऱ्यांनी घेऊन ही समस्या तात्काळ निकाली काढावी, अशी अपेक्षा प्रवाशी करीत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील **श्री. मधुसुदन गणेश घांग्रेकर व इतर** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमीन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे - चिखले, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १४१ | २ | ०-९४-००<br>पो. ख. ०-०१-००<br>**०-९५-००** | १५.०० |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **७ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- १६/०८/२०२२

**सही/-**
**ॲड. श्री. अमोल शंकर साखरे**
**शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. ८६५२२३३७७१/९३२४३७२१६६**


# पोलादपुरात स्वातंत्र्याच्या साक्षीदारांचा सत्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील धारवली ग्रुपग्रामपंचायत कार्यालयात सरपंच अश्विनी सातपुते यांच्या हस्ते सोमवारी ध्वजारोहण करण्यात आल्यानंतर अमृत सरोवर अभियानांतर्गत माजी सैनिक संदीप जैतपाल यांच्या हस्ते आंग्रेकोंड रिंगीचा तलाव येथे ध्वजारोहण करण्यात आले.

वावे आणि आंग्रेकोंड ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील कार्यक्रम झाल्यानंतर स्वातंत्र्यदिनी धारवली ग्रुपग्रामपंचायतीमध्ये झालेल्या कार्यक्रमात ७५ वर्षे उलटून गेलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा स्वातंत्र्याचे साक्षीदार म्हणून सन्मान करण्यात आला. कोविड योध्दा म्हणून पत्रकार, अंगणवाडी सेविका व मदतनीस, डॉक्टर्स, कर्मचारी, आशा सेविका यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. बीएसएफ एअरविंगमध्ये निवड झाल्याबद्दल प्रितेश सकपाळ या तरूणाच्या कुटूंबियांचा गौरव करण्यात आला. कोविड काळात नोडल अधिकारी प्रदीप पवार, धारवली ग्रामसेवक उमेश मनवे, ग्रामपंचायत कर्मचारी भिकोबा कुळे, वावे वेल्फेअर सोसायटीचा या वेळी विशेष सन्मान करण्यात आला.

अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन सोहळ्यानिमित्त पंचायत समितीच्या कृषी विभागाचे झोनल अधिकारी अरूण धिवरे यांच्या सहकार्यातून विविध उपक्रम राबविण्यात आले. सरपंच अश्विनी सातपुते, उपसरपंच सिराज फकीर, तंटामुक्ती गाव अध्यक्ष सिध्दार्थ सकपाळ, ग्रा.पं. सदस्य विलास सकपाळ, सईद करबेलकर, बाळाराम चाचले, नसिमा चाफेकर, भाग्यश्री वरवाटकर, सरिता जैतपाल, दिप्ती जंगम, रहेमत काझी, सामाजिक कार्यकर्ते हर्षल सातपुते, विश्वास सातपुते, पोलीस पाटील रोशन सकपाळ, मुख्याध्यापक प्रदीप पवार आणि अतुल तडवी आदींच्या सहकार्याने अनेकविध उपक्रम राबविण्यात धारवली ग्रुपग्रामपंचायतीला यश आले.







# रोह्यात स्वातंत्र्य दिन सोहळा दिमाखात

**रोहे : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या रोहा येथील मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात सोमवारी (दि. १५)स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे चेअरमन संदीप गांगल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी संगीत शिक्षक आर. पी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली.



विद्यालयातील एनसीसी कमांडर संदीप चांदोरकर आणि आरएसपी शिक्षिका समिता वाघमारे यांनी एनसीसी व आरएसपी स्काऊट गाईड विद्यार्थ्यांच्या संचालनाचे व कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या वेळी सर्वांनी पर्यावरण संवर्धन प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण पानसरे यांनी केले. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य अमित आठवले, विलास गुजर, मुस्तफा रोहावाला, बापू जोशी, निवृत्त मुख्याध्यापक सदानंद मेहेंदळे, विद्यालयाचे प्राचार्य रमेश मोरे, डी. एम. पवार, के. आर. पाटील, नारायण पानसरे, संग्राम गायकवाड यांच्यासह सर्व सेवक, शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी आणि पालक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

आमच्या वसंत व्हिला गृहनिर्माण संस्थेच्या सि.स.क्र. ७४६/१ असून सदर संस्थेचा पुनर्विकास करणे आहे. इच्छुक विकासकांनी संस्थेचे सचिव श्री. दिप ध्रु. कोठारी यांच्याशी संपर्क साधून आपल्या निविदा जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांत सिलबंद लखोट्यात सादर कराव्यात.

टिप :-

- उशिरा प्राप्त होणारे निविदा स्वीकारली जाणार नाही.
- कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे.

दिनांक : १६/०८/२०२२

शिक्का

**सही/-**
**दिप ध्रुवकुमार कोठारी**
**(सचिव)**
**वसंत व्हिला गृह. संस्था मर्या.**
**शिवाजी पथ, पेण, रायगड**
**र. नं.** RGD/PEN/HSG/(Tc)/442/98-99

## निवडक

### चिंचपाडा गावात घरफोडी

**पनवेल :** घरात घुसून हजारो रुपये किमतीचा ऐवज चोरी केल्याची घटना पनवेलजवळील चिंचपाडा गाव विठ्ठलवाडी येथे घडली आहे. रुकिमीणीबाई कांबळे यांच्या राहत्या घराच्या दरवाज्यास असलेल्या कडीचे स्क्रू सैल करून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून जवळपास ३१,६०० रुपये ऐवज चोरी केली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### जनावरांची हत्या करणारा गजाआड

**पनवेल :** पुष्पक नगर परिसरात मुक्या जनावरांची हत्या करणाऱ्या एका आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या आरोपीवर यापूर्वी अश्या प्रकारचे १३ गुन्हे दाखल आहेत. नागोठणे व रोहा येथून एक गाय व एक बैल या मुक्या जनावरांना इंजेक्शन मारून बेशुद्ध करून त्यांना इनोव्हा गाडी तुन पनवेल जवळील पुष्पक नगर येथे आणून त्यांची हत्या केल्याने याबाबतची माहिती स्थानिक रहिवाशांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांना माहिती दिली. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने छापा टाकून सराईत गुन्हेगार नूर मोहम्मद कच्छी उर्फ पापा याला ताब्यात घेतला आहे. तर त्याचे सहकारी प्रसार झाले आहेत. घटनास्थळावरून इंजेक्शन, बेशुद्ध करणारे औषधे, दोर, इनोव्हा गाडी, सूरी आदी साहित्य हस्तगत केले आहे.

### श्री नारायणबाबा प्री प्रायमरी शाळेतर्फे रॅली

**पनवेल :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त



पनवेल रेल्वे स्टेशन जवळील श्री नारायणबाबा प्री प्रायमरी शाळेतर्फे शालेय विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. श्री नारायणबाबा आश्रम ते शहरातील शिवाजी चौक व पुन्हा आश्रम अशी ही रॅली ध्वहजारोहणानंतर काढण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांचा सहभाग व उत्साह मोठा होता. या रॅली चे आयोजन वाईस चेअरमन राम थदानी, सचिव रामलाल चौधरी यांनी केले होते.

### साईनगर परिसरात घरफोडी

**पनवेल :** किचनच्या खिडकीवाटे आत प्रवेश करून अज्ञात चोरट्याने जवळपास ६७ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची घटना शहरातील साईनगर परिसरात घडली आहे. या ठिकाणी राहणारे बानु मुमताज अबु शेख, रा.सुर्यकिरण अपार्टमेंट, सार्ईनगर यांच्या राहत्या घराच्या किचनच्या खिडकीवाटे अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून मोबाइल फोन व सोन्याची चेन असा मिळून जवळपास ६७ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वृद्ध महिलेची फसवणूक

**पनवेल** : दोन अनोळखी व्यक्तींनी एका ६२ वर्षीय वृद्ध महिलेकडून ७५ हजार रुपयाचा ऐवज चोरून नेल्याची घटना शहरात घडली आहे. राजूबाई म्हात्रे (६२ रा.धाकटा खांदा) या कर्नाळा सर्कल येथील रिक्षा स्टँण्ड जवळून व तेथून रुपाली टॉकीजकडे जाणाऱ्या रस्त्यावरील येशीबाई मंदिरासमोरून जात होत्या. या वेळी त्यांच्याजवळ दोन अनोळखी व्यक्ती आले व त्यांनी फुकट रेशन मिळवून देतो असे त्यांना आमिष दाखवून मंदिराजवळ नेवून त्यांच्याशी बोलण्याचा बहाणा करून त्यांच्या हातातील पर्समध्ये असलेली रोख रक्कम व सोन्याची चेन असा मिळून ७५ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमध्ये दागिन्यांची चोरी

**पनवेल :** सोन्याच्या बांगड्या व सोन्याची कर्णफुले अज्ञात चोरट्याने लबाडीने चोरून नेल्याची घटना शहरात घडली आहे. बीबी फातिमा यांच्या हातातील सोन्याच्या बांगड्या व कानातील सोन्याची कर्णफुले ही त्या राहत असलेल्या मॉडेल सोसायटी ते त्यांचे सासरे राहत असलेल्या समा बंगलो या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने जवळपास दीड लाखाचा ऐवज चोरी केला. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### फाळणी वेदना स्मृती दिन प्रदर्शन

**पनवेल :** केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार १४ ऑगस्ट हा दिवस फाळणी वेदना स्मृती दिन म्हणून पाळण्याचे घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ११ ते १४ ऑगस्टदरम्यान फाळणी वेदना स्मृती दिन प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त कल्पिता पिंपळे, स्वातंत्र्य सैनिकांचे वारसदार बबन जगनाडे, सुरेंद्र गोडबोले आदी या वेळी उपस्थित होते. या प्रदर्शनाला शेकडो नागरिकांनी भेट देत ऐतिहासिक आठवणींना उजाळा दिला. या प्रदर्शनामध्ये फाळणी काळातील विविध प्रसंगांची माहितीसह फोटो ठेवण्यात आले होते. प्रदर्शन यशस्वी झाल्याने आयोजकांचेदेखील स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांनी आभार मानले.



**चिरनेर :** गावातील शाळा, कॉलेज व शासकीय कार्यालयाच्या प्रांगणात झेंड्याला सलामी देऊन राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. या वेळी उद्योगपती पी. पी. खारपाटील, राजेंद्र खारपाटील आदींच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी प्रभातफेरीही काढण्यात आली होती.

# पनवेल स्टेशनमध्ये लवकरच नवा पादचारी पूल

**पनवेल : वार्ताहर**

वाढत्या प्रवासी संख्येमुळे पनवेल रेल्वेस्थानकावर असलेले पादचारी पूल कमी पडू लागले आहेत. पुलावर होणारी गर्दी पाहता पनवेल रेल्वेस्थानकावर नवीन पादचारी पूल उभारण्यात येणार असून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसप्रमाणे पनवेल रेल्वेस्थानकाचा विकास केला जाणार आहे.



पनवेल रेल्वेस्थानकामध्ये सध्या सात फलाट आहेत. त्यातील चार उपनगरी, तर तीन लांब पल्ल्याच्या गाड्यांकरिता वापरले जातात. सध्या पनवेल रेल्वेस्थानकाचा विकास नवीन टर्मिनस म्हणून करण्यात येत आहे. त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्यांची संख्या वाढून फलाटांची संख्यादेखील १२वर पोहचणार आहे. तसेच या नव्या टर्मिनसवरून सीएसएमटी, दादर, मुंबई सेंट्रल, तसेच लोकमान्य टिळक टर्मिनसप्रमाणे पनवेल येथूनसुद्धा लांब पल्ल्याच्या गाड्या धावणार आहेत. या सुविधेमुळे नवी मुंबई, पनवेलमधील नागरिकांना आता कल्याण, ठाणे येथे जाण्याची गरज भासणार नाही. तसेच दादर, सीएसएमटी, कल्याण, एलटीटी स्थानकांवरील भार कमी होणार आहे. पनवेल आणि परिसराचा विकास व विस्तार लक्षात घेऊन या स्थानकात अत्याधुनिक दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत. या कामासाठी सिडकोचा ६७, तर रेल्वेचा ३३ टक्के सहभाग आहे. त्यातूनच नव्या पादचारी पुलाची उभारणी होणार आहे. प्रत्येक फलाटावर सरकते जिने व नव्या पादचारी पुलावरून फलाटावर उतरण्यासाठी सरकत्या जिन्यांची सोय असणार असून, पाच आणि सात फलाटांना जोडणाऱ्या जुन्या पादचारी पुलाला दोन ठिकाणी उद्वाहक (लिफ्ट)चे काम सुरू आहे.

## अमर पाटील यांच्याकडून निवृत्त जवानांचा गौरव

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त पनवेल महानगरपालिकेचे माजी स्थायी समितीचे सभापती अमर पाटील यांच्या वतीने निवृत्त जवानांचा गौरव कळंबोली येथील भाजपा मध्यवर्ती कार्यालयात अती उत्साहात करण्यात आला. यावेळी नवी मुंबई, पनवेल, खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा येथून ४० निवृत्त जवानांनी उपस्थित लावली होती. या वेळी निवृत्त जवानांनी आपल्याला येत असलेल्या वाईट अनुभवांचा पाढा वाचला. आणि आमच्यावर होत असलेल्या अन्याय वरिष्ठा पर्यंत पोहचविण्याची विनंती यावेळी केली. या वेळी अमर पाटील यांनी सांगितले, मी आपल्या समस्या कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या समोर ठेवणार आहे आणि त्या सोडविण्यासाठी त्यांच्याकडून नक्कीच प्रयत्न करण्यात येतील. असा मी विश्वास देतो.

या कार्यक्रमात माजी सभापती प्रमिला पाटील, कळंबोली भाजप महिला अध्यक्ष मनीषा निकम, भाजप महिला सरचिटणीस दुर्गा साहनी, भाजपा महिला उपाध्यक्षा प्रियांका पवार, भाजपा महिला अध्यक्ष सुलभा ठाकरे, कळंबोली चिटणीस निता अधिकारी आदीच्या सहकार्यातून या जवानांना सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ देवून गौरव करण्यात आला.



## उरण येथे स्वातंत्र्य दिन साजरा

**उरण : वार्ताहर**

भारतीय स्वातंत्र्य दिन उरण शहरात सर्वत्र साजरा करण्यात आला. उरण नगर परिषद कार्यालयासमोर प्रशासक तथा मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



त्या वेळेस तंबाखू मुक्त अशी शपथ देण्यांत आली. त्याच प्रमाणे नगर परिषद भवरा समाज मंदिर, प्राथमिक शाळा क्र. १ व २, प्राथमिक शाळा मोरा येथेही प्रशासक तथा मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, प्रशासकीय अधिकारी अनिल जगधनी, नगरसेवक रवी भोईर, कौशिक शाह, राजेश ठाकूर, कनिष्ठ अभियंता झुंबर माने, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, माजी स्वतंत्रसैनिक संजय पवार, उरण नगरपरिषद कर्मचारी विजय पवार आदी उपस्थित होते.

उरण तहसील कार्यालयाच्या परांगणात तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी पोलीस अधिकारी, नायब तहसिलदार(महसूल) नरेश पेढवी, निवासी नायब तहसीलदार गजानन धुमाळ, सैनिक रामनाथ गायकवाड आदी उपस्थित होते.

दरम्यान, ग्राईडवेल नॉर्टन मोरा येथे ध्वजारोहण करून ॲडमिनचे मॅनेजर आय. बी. सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली मोरा गावात रॅली काढण्यात आली. ग्राईडवेल परिवार सहभागी झाले होते.

## होपमिरर फाउंडेशनतर्फे मोफत नेत्र तपासणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

होपमिरर फाउंडेशनने स्वातंत्र्य दिनानिमित्त सार्थ नेत्रालय आणि प्रहार ऑप्टिकल यांच्या सहकार्याने धानसर गावात गरजूंसाठी मोफत नेत्र तपासणीचे आयोजन केले होते. ज्यामध्ये मोफत नेत्र तपासणी आणि निराधारांसाठी मोफत चष्मे वाटप करण्यात आले, तसेच गरजूंना डोळ्यांच्या सर्व शस्त्रक्रियांवर सवलत देण्याचे ठरवले.



या मोहिमेद्वारे होपमिरर फाउंडेशनने गरजूंना त्यांच्या डोळ्यांच्या समस्यांसाठी मदत केली. या मोहिमेचा सर्व ग्रामस्थांना लाभ झाला. या वेळी होपमिरर फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष रमजान शेख, अक्रम शेख, आशिष कदम, मौझम शेख, अरमान शेख, सार्थ नेत्रालयाचे वैभव बांदल, कुलदीप दामगुडे विनया पाटील, प्रहार ऑप्टिकल चे नारायण आडे आणि धानसर गावचे इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

## प्रजापती समाज विकास मंडळातर्फे महाराजा दक्ष प्रजापती जयंती, स्वातंत्र्य दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ, नवी मुंबईतर्फे महाराजा दक्ष प्रजापती यांची जयंती आणि स्वातंत्र्यदिन सोमवारी (दि. १५) नवीन पनवेल येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व महाराज दक्ष प्रजापती यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थितांनी 'जय जय कार' म्हणत महाराज भगवान दक्ष प्रजापती यांच्या फोटोला पुष्प अर्पण केले. छोटे चित्रपट आणि मालिकांमध्ये कलाकाराची भूमिका साकारणारे सेलिब्रिटी दीपक प्रजापती यावेळी खास उपस्थित होते. संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमात अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष सी. पी. प्रजापती, सचिव विनोद प्रजापती, सर्व प्रजापती शक्ती ट्रस्टचे अध्यक्ष अजय प्रजापती, संतराम बीए फाउंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र प्रजापती, दिलीप प्रजापती, ठाणे जिल्हाध्यक्ष गजेंद्र प्रजापती, चंद्रशेखर प्रजापती, डॉ.ज्ञान प्रकाश प्रजापती, डॉ. इंद्रजित प्रजापती, पूनम प्रजापती, ग्यानती प्रजापती, शिवप्रसाद प्रजापती, रामबचन प्रजापती आदींनी मेहनत घेतली.



**पनवेल : कृष्णाशेठ पाटील सामाजिक विकास मंडळ, पडघेतर्फे दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यासोबतच जि. प. शाळा पडघे अंतर्गत शालेय कला, क्रीडा क्षेत्रातील लहान मुलांचा गुणगौरव करण्यात आला.**



**खारघर : माजी पंतप्रधान व भाजपचे ज्येष्ठ नेते, भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजप खारघर मंडलच्या माध्यमातून जनसंपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी शहर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, जिल्हा चिटणीस गीता चौधरी, युवा मोर्चा सरचिटणीस अमर उपाध्याय, ज्येष्ठ नेते गिरीश गुप्ता, नवनीत मारू, शैलेंद्र त्रिपाठी, धार्मिक जोशी आदी उपस्थित होते.**



**पनवेल : रॉयल ओझोन सोसायटी शिरढोण येथे स्वातंत्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी सोसायटीचे सेक्रेटरी सचिन चव्हाण, कोषाध्यक्ष रवींद्र चौगुले, सदस्य शालिकराम उपाध्ये, प्रशांत मोडक, भाजप उत्तर रायगड कामगार आघाडी सहसंयोजक समिरा चव्हाण, सभासद रूपेश पवार, उज्वल ओझा, दीपक नार्वेकर आदी सभासद उपस्थित होते.**

## स्वातंत्र्य दिनी पनवेलमध्ये रॅली
### विद्यार्थ्यांचा सहभाग



**पनवेल : वार्ताहर**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त को. ए. सो.इंदुबाई आ. वाजेकर इंग्रजी माध्यम शाळा पनवेलमधील विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पनवेलमध्ये रॅली काढली.

यात अनेक शाळातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. या वेळी शाळा समिती अध्यक्ष व्ही. सी. म्हात्रे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मानसी कोकीळ, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मनिषा पाटील सर्व विद्यार्थी, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यात सहभागी झाले होते.




## पाऊस आला..

पाऊस आला पाऊस आला ।
गरमी जाऊन गारवा आला ।।

पाऊस आला काळ्या मातीत ।
अंकुर रूजले धरणी मातीत ।।

पाऊस आला साऱ्या अंगणात ।
मुले नाचती खेळती मैदानात ।।

पाऊस आला बागेत शेतात ।
शेतकरी आनंदी होई मनात ।।

पाऊस आला डोंगर दऱ्यात ।
नद्या नाले वाहती खळखळाट ।।

पाऊस आला नभातून ।
विजा चमकमी ढगातून ।।

पाऊस आला छपरावर ।
तळे साचती धरणीवर ।।

पाऊस आला परस बागेवर ।
पक्षी किलबील करती वृक्षावर

पाऊस आला साऱ्या धरणीवर ।
हिरवा शालु पांघरला भूमीवर ।।

पाऊस आला जंगलात ।
मयुर नाच करती वनात ।।

पाऊस आला जिवनात ।
त्या विना आम्हा न करमेनात ।।



-डॉ. जनार्दन महिसरे
नवीन पनवेल

# कर्जतमधील १४ पशुवैद्यकीय दवाखान्यांत ध्वजारोहण झाले नाही

## जिल्हा पशुधन अधिकाऱ्यांकडून चौकशीचे आदेश

**कर्जत : बातमीदार**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सर्वत्र साजरा केला जात असून शासकीय आस्थापनांच्या ठिकाणी १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत तिरंगा ध्वज फडकावला पाहिजे, अशा शासनाच्या सूचना होत्या. मात्र कर्जत तालुक्यातील तब्बल १४ पशुवैद्यकीय दवाखान्यांत स्वातंत्र्य दिनी (दि. १५) देखील राष्ट्रध्वज फडकवला नाही. या प्रकरणी कर्जत तालुका पशुवैद्यकीय विस्तार अधिकाऱ्यांच्या अहवालानंतर जिल्हा पशुधन विकास अधिकारी डॉ. शाम कदम यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.



शासनाच्या हर घर तिरंगा या अभियानात सरकारी आस्थापनांना १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत तिरंगा फडकावणे बंधनकारक करण्यात आले होते. सर्व सामन्य नागरिकांसह सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये या अभियानात सहभागी झाली होती. मात्र कर्जत तालुक्यातील तब्बल १४पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतीवर या काळात तसेच अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनीदेखील राष्ट्रध्वज फडकले नाहीत, अशी धक्कादायक माहिती, माहिती अधिकार कार्यकर्ते दिगंबर चंदने यांनी समोर आणली आहे. त्यानंतर तालुका पशुधन अधिकाऱ्यांच्याशी चंदने यांनी संपर्क साधला असता तालुक्यातील तब्बल १४ पशुवैद्यकीय दवाखान्यांत ध्वजारोहण झाले नसल्याचा प्रकार समोर आला आहे.

कर्जत पंचायत समितीच्या पशुवैद्यकीय विभागाचे विस्तार अधिकारी यादव यांनी ध्वजारोहण न झालेल्या तालुक्यातील दवाखान्यांचा अहवाल रायगड जिल्हा पशुधन अधिकाऱ्यांना पाठविल्यानंतर या प्रकारच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

**"माथेरानमध्ये असलेल्या ४५० घोड्यांच्या आरोग्याचा प्रश्न कायम असताना येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांत गेल्या कित्येक दिवसांपासून पशुवैद्यकीय अधिकारी फिरकलेच नाहीत. १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत या पशुवैद्यकीय दवाखान्याबाहेर ध्वजारोहण झाले नाही.**
**–दिगंबर चंदने, माहिती अधिकार कार्यकर्ते, माथेरान, ता. कर्जत**

**"ज्या पशुवैद्यकीय दवाखान्यात हर हर तिरंगा अभियान राबविले गेले नसेल तसेच स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकवला गेला नसेल तर त्या ठिकाणी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर शासन निर्णयानुसार कारवाई केली जाईल.**
**–डॉ. शाम कदम, जिल्हा पशुधन अधिकारी, रायगड**

## महाडमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात

**महाड : प्रतिनिधी**

अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन सोमवारी (दि. १५) महाडमध्ये जल्लोषात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने विविध शासकीय कार्यालये आणि सामाजिक संस्थांनी ध्वजारोहण करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

महाड शहरातील मुख्य ध्वजारोहण तहसील कार्यालयाच्या प्रांगणात उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्या हस्ते झाले. या वेळी पद्मश्री हिम्मतराव बावस्कर यांच्यासह शासकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील प्रांत, नगर पालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी कार्यालयात तसेच शहर पोलीस ठाणे, शासकीय विश्रामगृह, न्यायालय या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. शहरातील चवदार तळे येथे आमदार भरत गोगावले, पद्मश्री हिम्मतराव बावस्कर आदिंच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

स्वातंत्र्य दिनानिमित्त महाड नगरपालिकेच्या वतीने शहरात सायकल रॅली काढण्यात आली होती. विविध सामाजिक संस्थांनीही सायकल, मोटारसायकल रॅली काढल्या होत्या. या वेळी संपूर्ण शहरात भारताचा जयघोष निनादला. शहर किराणा व्यापारी संघटनेने छत्रपती शिवाजी चौकात मोफत जिलेबी वाटप केले. अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून फ्रीडम ग्रुप तर्फे वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. तसेच महाड नगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मानदेखील केला. शहरातील हनुमान आखाडा, गवळ आळीमध्ये ध्वजवंदनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

किल्ले रायगडावर शासकीय ध्वजारोहण केले जाते. महाडचे नायब तहसीलदार प्रदीप कुडळ यांच्या हस्ते सोमवारी रायगड किल्ल्यावर ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी रायगड प्राधिकरणाचे युवराज संभाजीराजे उपस्थित होते.



## हाजी लियाकत शाळेच्या विद्यार्थ्यांनी काढली नेरळमध्ये रॅली

**कर्जत : बातमीदार**

अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त नेरळ येथील हाजी लियाकत स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या ५००हून अधिक विद्यार्थ्यांनी सोमवारी (दि. १५) शाळेतून संपुर्ण गावात तिरंगा रॅली काढली होती.



नेरळ हुतात्मा चौक येथील हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या अर्धपुतळ्यांना अभिवादन करून रॅलीला सुरुवात झाली. प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात तिरंगा ध्वज देण्यात आला होता. हुतात्मा चौकातून ही रॅली कल्याण रस्त्याने जकात नाका, बाजारपेठ, पोलीस ठाणे मार्गे शाळेत पोहचली. तेथे रॅलीचा सांगता करण्यात आली. रॅली दरम्यान, नेरळमधील लोकमान्य टिळक चौक, हुतात्मा हिराजी पाटील चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, हुतात्मा भाई कोतवाल चौक येथे विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकार आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

## मुरूडच्या डकलीन स्कूलमध्ये ध्वजारोहण

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरानजीक असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या डकलीन इंटरनॅशनल स्कूलमध्ये सोमवारी (दि. १५) मुरूड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिलावर महाडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्वा निमित्त डकलीन इंटरनॅशनल स्कूलने प्रभातफेरी काढून स्वच्छतेविषयी जनजागृती केली. तसेच विद्यार्थ्यांच्या निबंध व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना सोसायटीचे अध्यक्ष दिलावर महाडकर, सचिव सुशीलकुमार शिंदे, मुख्याध्यापिका शारदा लाड यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.




यावेळी माजी नगरसेवक संजय गुंजाळ, मुरूड तालुका सुपारी संघाचे चेरमन महेश भगत, दुकानदार असोसिएशनचे अध्यक्ष जाहिद फकजी, समीर दौनाक, हसमुख जैन, साहिल महाडकर, सोहेल महाडकर, तेलवडे सरपंच प्रमोद तांबडकर, माजी सरपंच मनोज कमाने, संतोष पाटील, अजित कारभारी, इस्माईल सिद्दीकी यांच्यासह विद्यार्थी आणि नागरिक या वेळी उपस्थित होते.

## रोहा रेल्वे पोलीस ठाण्यात ध्वजारोहण



**रोहे : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनानिमित्त रोहा रेल्वे पोलीस ठाण्यात निरीक्षक आर. व्ही. जगताप यांच्या हस्ते सोमवारी (दि. १५) ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी माजी सैनिक प्रभाकर गोपीनाथ कारभारी (रा. खारापटी) व वसंत सखाराम वाटवे (रा. पडम) यांचा शाल, श्रीफळ व पुष्प गुच्छ देवून सत्कार करण्यात आला. या वेळी महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे यांच्यासह रेल्वे स्टेशन प्रबंधक, रोहा आरपीएफ जवान उपस्थित होते.

## रोह्यात सांस्कृतिक कार्यक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त रोहा पंचायत समिती तर्फे सोमवारी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. पंचायत समितीमधील अनेक कर्मचाऱ्यांनी या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला होता.

गट विकास अधिकारी शुभदा पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी महारुद्र फडतरे, विस्तार अधिकारी सुनील गायकवाड, प्रशासन सहाय्यक दिनेश वारगे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.



## अलिबागेत व्याख्यानमाला




**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चेंढरे–अलिबाग येथील चिंतामणराव केळकर विद्यालयामध्ये व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती.

प्रविण सरनाईक यांचे आंतरराष्ट्रीय युथ एक्सेंज या विषयावर, अ‍ॅड. अश्विनी पाटील यांचे स्त्रियांविषयीचे बदलते कायदे, डॉ. राजीव धामणकर यांचे वैद्यकीय शिक्षण व प्रा. अविनाश ओक यांचे भारतीय राज्य घटना या विषयांवर व्याख्यान झाले.

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. या कालावधीत स्त्रियांविषयी अनेक कायदे करण्यात आले. या कायद्यांची माहिती केवळ स्त्रियांनीच नाही तर पुरुषांनीदेखील करुन घेतली पाहिजे, असे मत अ‍ॅड. अश्विनी पाटील यांनी या वेळी व्यक्त केले.

पैसे, प्रतिष्ठा, संगत, वाढती स्पर्धा या सर्वांचा परिणाम पेशा निवडीवर होतो. आपल्या आवडीचा पेशा निवडल्यास काम करण्याचे समाधान मिळते. वैद्यकीय क्षेत्रातदेखील विविध क्षेत्रात काम करता येते. आपल्या आवडीनुसार विद्यार्थ्यांनी आपले क्षेत्र निवडायला हवे, असा सल्ला डॉ. राजीव धामणकर यांनी विद्यार्थ्यांना दिला.

आपल्या देशाने लोकशाही स्वीकारली. देशाची घटना तयार करण्यात आली. घटनेमध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळाचे अधिकार दिले आहेत. लोकशाही टिकवण्यासाठी त्यांचे एकमेकांवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. अनिर्बंध सत्ता ही घातकच असते, असे मत प्रा. अविनाश ओक यांनी व्यक्त केले.

लायन्स क्लबचे आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यक्रम होतात. यामुळे वेगवेगळ्या देशातील संस्कृतीची माहिती तरुणांना होते, असे प्रविण सरनाईक म्हणाले. अलिबाग येथे आलेल्या पोलंडमधील दोन विद्यार्थ्यांनी या वेळी केळकर विद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला.



## जांबरुंग विद्यालयात विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन

**कर्जत : बातमीदार**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त कर्जत तालुक्यातील जांबरुंग येथील माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या विविध कलाकृतींचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. हे प्रदर्शन तीन दिवस चालणार असून, याप्रदर्शनातील वस्तू खरेदी करण्यासाठी ग्रामस्थ गर्दी करीत आहेत.

विद्यार्थ्यांमधील विविध कला गुणांचा विकास व्हावा, यासाठी जांबरुंग येथील माध्यमिक विद्यालयाने हर घर तिरंगा या उपक्रमाअंतर्गत, विद्यार्थांनी बनविलेल्या विविध कलाकृतींचे प्रदर्शन आयोजित केले आहे.तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्‌घाटन शाळा समिती अध्यक्ष आणि जांबरुंगचे सरपंच दत्तात्रय पिंपरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते अरुण मेदगे, मंगेश सावंत, संतोष पिंपरकर, अनिल पिंपरकर, संदेश सावंत, शिवाजी बिबवे, छगन कोकणे, कैलास बांगर आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनासाठी विविध वस्तू बनविल्या असून त्यांची विक्रीदेखील सुरू आहे.



## मुरूडमध्ये महाराष्ट्र बँकेचा ग्राहक मेळावा

**मुरूड : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रच्या मुरुड शाखेचा ग्राहक मेळावा नुकताच साजरा करण्यात आला. शाखा व्यवस्थापक दिपेश लोखंडे यांनी बँकेच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. तसेच आमच्या शाखेचे सेवाभावी कर्मचारी ग्राहकांना चांगली सेवा देण्याचा अधिकाधिक प्रयत्न करतील, अशी ग्वाही दिली.

बँकेतील गर्दी टाळण्यासाठी व ग्राहकांना तत्पर सेवा मिळण्यासाठी बंद पडलेली एटीएम सेवा उपलब्ध व्हावी, अशी मागणी सेवा निवृत्त संघटनेचे पदाधिकारी बाळकृष्ण कासार यांनी या मेळाव्यात केली.

ठेव पावत्यांसह अन्य मेसेज ग्राहकांना वेळोवेळी पोहचविण्याची खबरदारी घेतली जाईल, असेही व्यवस्थापकांनी सांगितले. मोहनिश जाधव, पायल मेहता, मिलींद चव्हाण, पांडुरंग म्हात्रे यांनी ग्राहक मेळावा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. एम. एस. जाधव, दत्तात्रय गायकवाड, किशोर पाटीत, शरद बागडे, मिलींद दिवेकर यांच्यासह बँकेचे खातेदार या मेळाव्याला उपस्थित होते.

## रोह्यातील देशमुख महाविद्यालयात विविध उपक्रम





**रोहे : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या रोहे येथील डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला वृक्षारोपण तसेच भित्तीपत्रक, रांगोळी व निबंध स्पर्धा घेण्यात आयोजन केले होते.

सर्वप्रथम प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांच्या प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपणाची सुरुवात झाली. महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. तुळशीदास मोकल, कार्यक्रम अधिकारी प्रा. सीमा भोसले, कार्यक्रम अधिकारी प्रा. अनंत थोरात, डॉ. कमलाकर कांबळे, डॉ. सम्राट जाधव, प्रा. सुकुमार पाटील, प्रा. शत्रुघ्न लोहकरे, डॉ. अनिल शिंदे, अनिल ठाकूर, कल्पेश अनुभवणे, अरुण पाटील, संतोष शेलार, अनंता शिद, दत्ता कांबळे व राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवडक ६०विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भाग घेतला होता. या वेळी महाविद्यालय परिसरात वड, करंज, गुलमोहर व सप्तपर्णी अशा प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तर वर्षे या संकल्पनेवर आधारीत भित्तीपत्रक, रांगोळी व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. भित्तीपत्रक स्पर्धेत ४०, रांगोळी स्पर्धेत १५ आणि निबंध स्पर्धेत ३०विद्यार्थी सहभागी झाले होते. हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मदत केली.

## पनवेलमध्ये भव्य टेबल टेनिस स्पर्धा

# अनिशा पात्रा, लोकेश पटवा विजेते

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ पनवेल आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच नवीन पनवेल येथे घेण्यात आली. या स्पर्धेत महिला एकेरीत अनिशा पात्रा आणि पुरुष एकेरीत लोकेश पटवा यांनी विजेतेपद पटकाविले. विजेत्यांना कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

नवीन पनवेल येथील सिडको समाजमंदिरात शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा झाली. बक्षीस वितरण समारंभास लायन्स क्लबचे विजय पाटील, स्पोर्ट्स डिस्ट्रीक्ट चेअरमन संजीव सूर्यवंशी, लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, सेक्रेटरी नंदकिशोर धोत्रे, स्पोर्टस प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, संजय पोतदार, नागेश देशमाने, अशोक गिल्डा, मधुकर भगत, के. एस. पाटील, मदन गोवारी, संजय गोडसे, मनोज म्हात्रे, गौतम म्हस्के, माजी अध्यक्ष मीना पोतदार, ज्योती देशमाने, भावना जेसवानी, शोभा गिल्डा, नूतन धोत्रे यांच्यासह इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

कै. मोरेश्वर सदाशिव पोतदार व कै. मंगला मोरेश्वर पोतदार यांच्या स्मरणार्थ लायन्स क्लब ऑफ पनवेलतर्फे पुरुष व महिला विजेत्यास फिरता चषक देण्यात आला. स्पर्धेचे चीफ रेफरी म्हणून पराग अंकोलेकर यांनी काम पाहिले.

**गटनिहाय विजेते व उपविजेते**

नवोदित : मुली-त्रिशा पावशे, आदिती सागर भगवते, मुले-आरूश जैन, दर्श राजाध्यक्ष, ११ वर्षाखालील : मुली-त्रिशा पावशे, स्वरा खराडे, मुले-शिवेश तांबोळी, अद्वित गुप्ता, १३ वर्षाखालील : मुली-वेदिका भगत, ईशा जाधव, मुले-हर्षद कुदाळे, अखिल नायर, १५ वर्षाखालील : मुली-अनिशा पात्रा, आदिती जाधव, मुले-स्वस्तिक कुंडू, ऋषी चव्हाण, १७ वर्षाखालील : मुली-अनिशा पात्रा, आदिती जाधव, मुले-विवेक पाल, ऋषी चव्हाण, १९ वर्षाखालील : मुली-अनिशा पात्रा, क्रिशिका धांडे, मुले-मैत्रेय सचिन नाईक, हृदय कंपनी, महिला एकेरी-विजयी अनिशा पात्रा, आदिती जाधव, पुरुष एकेरी-लोकेश पटवा, सौरव चतुर्वेदी, १३ वर्षाखालील मुली दुहेरी-वेदिका भगत व रूद्रा सरवणकर, ईशा जाधव व अनन्या मराठे, मुले दुहेरी-अव्यांत तांबे व अखिल गुब्बाला, संस्कार पाटील व लौकिक नाईक, १५ वर्षाखालील मुली दुहेरी अनिशा पात्रा व क्रिशिका धांडे, श्रावणी कुदाळे व ईशा जाधव, मुले दुहेरी-मयांक जैन व प्रियांशु जैन, प्रियांश कोहाडकर व श्लोक पाटील, पुरुष दुहेरी-नवीन नातू व रिषभ साळसकर, विलास धांडे व निकोलस दास, ज्येष्ठ पुरुष-नवीन नातू, अतुल देशमुख.

(छाया : महेंद्र खैरे)



## चौल येथील पोहण्याच्या स्पर्धेत अमर पाटील प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही चौल रामेश्वर पुष्करणीत पोहण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत खुल्या गटात अमर वासुदेव पाटील प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. व्दितीय क्रमांक भारत कुथे व तृतीय भूषण शिर्के यांनी पटकाविला.

स्पर्धा एकूण १४ गटात घेण्यात आली. गट क्रमांक एकमध्ये मुले डबल फेरी प्रथम अमर पाटील, व्दितीय अमित पाटील, तृतीय प्रथमेश गर्जे, गट क्रमांक दोन मुले डबल फेरी प्रथम भारत कुथे, व्दितीय ऋतिक शिर्के, तृतीय संदीप भोईर, गट क्रमांक तीनमध्ये प्रथम स्वप्नील तांडेल, व्दितीय ओंकार वादळ, तृतीय आयुष चेरकर, गट क्रमांक चारमध्ये मुली प्रथम सई संजय पिळणकर, व्दितीय निरव वर्तक, तृतीय साई मंगेश पिळणकर, गट क्रमांक पाच मुले प्रथम अर्थव सचिन घरत, व्दितीय ऐश्वर्य अनिल घरत, तृतीय प्रिन्स भूषण पाटील, गट क्रमांक सहा मुले रिले प्रथम आदित्य घरत व ओमकार जाधव, व्दितीय हेमंत जाधव व विनायक नाईक, तृतीय जितेंद्र जाधव व आर्य जाधव, गट क्रमांक सात मुले रिले प्रथम अमर पाटील व अमित पाटील, व्दितीय ऋतिक शिर्के व भारत कुथे, तृतीय संकेत म्हात्रे व भावेश कडू, गट क्रमांक आठ मध्ये ओंढे बांधून मुली प्रथम गार्गी रवींद्र राऊळ, व्दितीय आर्या विनोद नाईक, तृतीय मानसी नरेश नाईक, गट क्रमांक नऊ मध्ये मुली खुला गट प्रथम स्वराली बाळकृष्ण म्हात्रे, व्दितीय स्वप्नाली बाळकृष्ण म्हात्रे, तृतीय पूर्वा नंदकुमार टेकाळकर, गट क्रमांक दहामध्ये मुले सिंगल फेरी प्रथम भावेश निलेश कडू, व्दितीय प्रथमेश गर्जे, तृतीय दिवेश हाले, गट क्रमांक अकरामध्ये मुले सिंगल फेरी प्रथम संकेत म्हात्रे, व्दितीय साईल सुरेश कुथे, तृतीय दक्ष नाईक, गट क्रमांक बारामध्ये रामेश्वर गट प्रथम जितेंद्र जाधव, व्दितीय हेमंत जाधव, तृतीय ऋषिकेश घरत, गट नंबर तेरा सिंगल फेरी प्रथम मानस टिवळेकर, व्दितीय चिराग हाले, तृतीय संस्कार महेश पिळणकर, गट क्रमांक चौदामध्ये प्रथम अमर पाटील, व्दितीय भारत कुथे, तृतीय भूषण शिर्के यांनी यश संपादन केले. विजेत्यांना ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते रोख रकम व स्मृतिचषक देऊन गौरविण्यात आले.

## कर्जतच्या दोन खेळाडूंना पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत 'सुवर्ण'

**कर्जत : बातमीदार**



केरळ येथे झालेल्या राष्ट्रीय ज्युनिअर क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत कर्जतचे खेळाडू रोहिणी मोडक आणि गणेश तोटे यांनी सुवर्णपदक पटकाविले. हे दोघेही संजय हेगडे स्पोर्ट्स अकादमीचे खेळाडू आहेत.

ज्युनिअर मुलींच्या ४३ किलो वजनी गटात रोहिणी मोडक हिने २०७.५ किलो वजन उचलून सुवर्णपदक प्राप्त केले, तर ज्युनिअर मुलांमध्ये १०५ किलो वजनी गटात गणेश तोटे याने ६५२.५ किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले. त्यांचे अभिनंदन होत आहे.

## उरण येथे आमदार चषक जलतरण स्पर्धेस प्रतिसाद

**उरण : वार्ताहर**





स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान, हौसी जलतरण संघटना आणि आलोक अ‍ॅक्वा इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने उरण येथे रविवारी (दि. १५) आमदार चषक जलतरण स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत नऊ गटांमध्ये २१० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, तालुका अध्यक्ष व नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष व नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक धनंजय कडवे, राजेश ठाकूर, जि. प. सदस्य विजय भोईर, मुख्यधिकारी संतोष माळी, मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विशाल पाटेकर, हौसी जलतरण संघटनेचे अध्यक्ष संतोष पाटील, सेक्रेटरी सुनील पाटील, हितेश शाह आदी उपस्थित होते.

बक्षीस वितरण समारंभात आंतरराष्ट्रीय जलतरणपटू रूपाली रेपाले यांनी मार्गदर्शन करून मुलांचे कौतुक केले. प्रत्येक गटात तीन बक्षिसे देण्यात आली.

## उरण तायक्कांडो अकॅडमीचा गौरव




**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

आमदार चषक जिल्हास्तरीय तायक्कांडो स्पर्धेत उरण तायक्कांडो अकॅडमीच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. याबद्दल त्यांचा आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार करण्यात आला.

सर्व पदक विजेते व मास्टर तेजस पाटील यांना भाजप तालुका अध्यक्ष व नगरसेवक रवी भोईर यांनी, तर मास्टर प्रथमेश यांना उपनगराध्यक्ष जयविन कोळी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमास भाजप शहर अध्यक्ष व नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक धनंजय कडवे, मी उरणकर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विशाल पाटेकर, श्री राघोबा देव मोटर ट्रेनिंग स्कूलचे संस्थापक प्रितम पाटील आदी उपस्थित होते.

## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत खालापूरच्या कुणाल पिंगळेला कांस्यपदक

**खोपोली : प्रतिनिधी**



पॉवरलिफ्टिंग ऑफ इंडिया आणि केरळ स्टेट पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सब ज्युनिअर-ज्युनिअर स्पर्धा केरळमध्ये झाली. या स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कुणाल सुभाष पिंगळे याने ५३ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकले.

कुणाल हा खालापूर तालुक्यातील घोडीवली गावचा रहिवासी आहे. जम्मू काश्मीरमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

भाजप जिल्हा कोषाध्यक्ष सनी यादव यांनी कुणालचे कौतुक केले आहे. ते म्हणाले, ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळत नसल्याने त्यांच्यामधील दडलेला खेळ जगासमोर प्रदर्शित होत नसतो, परंतु ग्रामीण भागात आजही असे खेळाडू आहेत, जे राज्याचे व देशाचे प्रतिनिधित्व करू शकतात. घोडीवली गावातील कुणाल पिंगळेने यश मिळवून प्रतिभा दाखवून दिली आहे.






**नवी मुंबई : पोलीस आयुक्त कार्यालय व महापालिकेच्या वतीने आयोजित १० किमी स्वातंत्र्याची अमृत महोत्सव दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नवी मुंबई पोलीस दलात गुन्हे शाखेमध्ये कार्यरत असलेले उत्तम तरकसे यांनीदेखील या स्पर्धेत सहभागी होत वयाच्या ५२व्या वर्षी ही मॅरेथॉन पूर्ण केली. त्यांचा मेडल देऊन सन्मान करण्यात आला.**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com